# प्रकरण चौथे

## ।। "कमला" नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण ।।

# प्रकरण चौथे

## ××× "कमला" नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण ×××

**प्रास्ताविक :::**

शतकानुशतके स्त्री ही समाजव्यवस्थेने घालून दिलेल्या बंधनांच्या बेडयांनी जखडली गेली आहे. रूढी, परंपरेच्या, सामाजिक संकेतांच्या ह्या एकतर्फी बेडया स्त्रीला गुलामगिरीचे जीवन जगायला भाग पाडत आल्या आहेत. स्त्री विषयक समस्यांचा विचार करून अनेक समाजसुधारकांनी स्त्रीला अनिष्ट रूढीच्या बेडयातून मुक्त करण्यासाठी लढा दिला. इंग्रजी राजवटीपासून शिक्षणाव्दारे स्त्री जीवन सुधारण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली. स्त्री जीवनात हळूहळू परिवर्तन होवू लागले. स्त्रिया शिकू लागल्या. स्वतंत्रपणे विचार करू लागल्या, आत्मोन्नतीचा मार्ग शोधू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात, भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरूषांना समान संधी व समान हक्क दिले. राज्यघटनेमध्ये स्त्रीला न्याय मिळाला असला तरी प्रत्यक्ष जीवन व्यवहारात मात्र तिला पूर्णांशाने न्याय मिळाला आहे, हे मान्य करता येत नाही. शिक्षित स्त्रीला आजही स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पुरेसे व्यक्ति-स्वातंत्र्य लाभत नाही, ही वस्तुस्थिती आहे. काळ बदलत असला तरी, कौटुंबिक जीवनात स्त्रीने दुय्यम स्थान स्वीकारून पारंपरिक चौकटीतच वागावे, अशी समाजाची धारणा असते. साहजिकच स्त्रीला कुटुंबात पुरूषवर्गाकडून गुलामासारखी वागणूक दिली जाते. एकूण, स्त्रीकडे बघण्याचा अधिकतर समाजाचा दृष्टिकोन पारंपरिक व अन्यायकारक आहे. नानाप्रकारचे अन्याय सहन करून ती जगते. स्त्री जीवनावर होणा-या अन्यायाच्या निराकरणा-साठी व स्त्री-मुक्तीसाठी, स्त्री-स्वातंत्र्यासाठी विविध चळवळी कार्यरत राहून विचारजागृती करत आहेत. विद्या जोशी म्हणतात, "आज स्त्री स्वातंत्र्य हे मानवी स्वातंत्र्यांच्या चळवळीचे एक अंग बनले आहे... स्त्री सुधारणेच्या चळवळीत सुधारकांना नाटक हा प्रकार एक महत्वाचे साधन म्हणून हाती लागला." [१]

मराठी साहित्यामध्ये स्त्री समस्यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. हे साहित्य स्त्रियांच्या परवशतेचे चित्रण करून थांबले नाही तर स्त्रीदास्य विमोचनाचा मार्गही त्यांनी दाखविला आहे. मराठी नाटककारांनी स्त्री- स्वातंत्र्याचा प्रश्न आपल्या नाट्यचित्रणाचा विषय करून, स्त्रीला स्वतःच्या व्यक्तिमत्वासाठी स्वातंत्र्य मिळावे, विविध प्रकारच्या गुलामगिरीतून तिची

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

मुक्तता व्हावी, तिला एक माणूस म्हणून जगता यावे; हे विचार प्रभावीपणे मांडले आहेत.

स्त्री स्वातंत्र्याच्या संदर्भात, विजय तेंडुलकर यांच्या "कमला" नाटकातील स्त्री समस्येचे चित्रण, आशय-अभिव्यक्तीबाबत वैशिष्ट्यपूर्ण वाटते. आधुनिक दृष्टिकोनातून तेंडुलकर स्त्री समस्येकडे बघतात. त्यांनी आजच्या युगातील स्त्रीची व्यथा, गुलामगिरी, व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवनात तिची होणारी कोंडी, ही कोंडी फोडण्याची तिची प्रबळ इच्छा यांचे परिणामकारक चित्रण, "कमला" नाटकात केले आहे. डॉ. वि. म. कुलकर्णी म्हणतात, "जग बदलले, युगे बदलली तरी स्त्रीची व्यथा व गुलामगिरी तशी संपुष्टात आली नाही हे एक विदारक सत्य आहे व "कमला" या नाटकात तेंडुलकरांनी ते प्रभावीपणे मांडले आहे."[२]

तेंडुलकरांचे "कमला" (१९८२) हे दशकापूर्वीचे नाटक आहे. या नाटकाचे बीज त्यांना दिल्लीत घडलेल्या एका घटनेचे वृत्तपत्रातून आलेले वृत्तांत वाचताना मिळाले. तथापि त्या घटनेचे हे नाटक नव्हे. त्या घटनेचा नाट्यरूप वृत्तान्त सांगण्याचा प्रयत्न तर नव्हेच नव्हे असे स्पष्ट करून तेंडुलकर आपल्या निवेदनात म्हणतात, "मूळ बीजाला दिलेला आकार सर्वस्वी माझा आहे. माझ्या मनाप्रमाणे आणि मनातील विषयाच्या अनुषंगाने मी तो दिला आहे."[३] इंडियन एक्सप्रेसच्या आश्वीन सरीन या पत्रकाराने प्रत्यक्षात घडवून आणलेल्या सत्य पण नाट्यपूर्ण प्रसंगाचा क्षण वापरून नाटककाराने प्रखर नाट्यानुभव देणारं नाटक उभ केलं आहे.[४]

प्रस्तुत नाटकाचा आशय पाहता, तेंडुलकरांनी जे निवेदन केले आहे त्यात तथ्य दिसते. कारण स्त्रियांच्या बाजारू विक्रीवर हे नाटक आधारित असलेतरी तेंडुलकरांनी केवळ तोच विषय केंद्रस्थानी मानून नाटकाची मांडणी केली नाही तर स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व आणि तिच्या पारंपरिक समस्या विचारात घेवून नाटक बांधले आहे.

जयसिंग जाधव हा धडाडीचा व महत्वाकांक्षी पत्रकार आहे. आजही या देशात माणसांची विक्री होते, बायकांचा लिलाव होतो, हे पुराव्यानिशी सिध्द करण्यासाठी व त्यानिमित्ताने सामाजिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जयसिंग "कमला" नावाच्या एका खेडूत स्त्रीला त्या बाजारातून विकत घेवून घरी आणतो. त्यानंतर तिला पत्रकार परिषदेत पेश करून, खळबळ उडवून द्यायची त्याची योजना असते. स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेणारा

जयसिंग आपल्या घरात मात्र पत्नी- सरिताच्या मताला व मनाला फारशी किंमत देत नसतो· तेव्हा साहजिकच जयसिंगने बाजारातून विकत आणलेली कमलाच गुलाम नाहीतर आपणही नव-याचे गुलाम आहोत ही जाणीव सरिताला होते· कमलामुळे जयसिंग व सरिता यांच्यात होणारा संघर्ष, आजच्या पत्रकारितेच्या निमित्ताने काकासाहेब व जयसिंग यांच्यात होणारा वादविवाद, यातून प्रस्तुत नाटक गतिमान व वेधक होत जाते·

सद्यकालीन सामाजिक वास्तव, स्त्री वर्गाकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टिकोन, उपेक्षित स्त्रीला दिली जाणारी वागणूक; संसारी स्त्रीच्या अपेक्षा आणि तिची परिवर्तनशील वृत्ती यांचा चिकित्सक शोध प्रस्तुत नाटकाव्दारे घेण्याचा हेतू आहे· वास्तववादी साहित्यकृतीला समकालीन सामाजिक परिस्थितीतून प्रेरणा व आशय द्रव्य मिळत असते· कमला नाटकातील आशयद्रव्य जाणून घेण्याच्या दृष्टीने, त्या नाटकाचे संविधानक पाहणे गरजेचे आहे·

## xxx "कमला" नाटकाचे संविधानक· xxx

जयसिंग जाधव हा एक इंग्रजी दैनिकात असोसिएट एडिटर म्हणून काम करीत असलेला महत्वाकांक्षी, धाडसी असा तरूण पत्रकार आहे· सरिता ही त्याची पत्नी आहे· घरकामात दक्ष असणारी व नव-याच्या सोयी सुविधाकडे लक्ष पुरविणारी ती एक पारंपरिक वळणाची स्त्री आहे· सरिताचे चुलते काकासाहेब घोरपडे हे काही निमित्ताने त्यांच्याकडे मुक्कामाला आलेले आहेत· ते सरदार घराण्यातले गांधीवादी विचारसरणीचे साठीचे गृहस्थ आहेत· ते जुन्या जमान्यातील ध्येयवादी पत्रकार आहेत· त्यांना आजची पैसा व प्रतिष्ठा यासाठी चालणारी पत्रकारिता पसंत नाही· विचारापेक्षा तपशील पुरविणा-या पत्रव्यवसायाला ते 'रक्तव्यवसाय' म्हणतात·[५] सरिता त्यांचे बोलणे बौध्दिक पातळीवर समजावून घेवू शकत नाही· प्राप्त परिस्थितीशी विनातक्रार जुळवून घेण्याची सरिताला इतकी सवय झाली आहे की ती व्यक्ती म्हणून आपल्याला स्वतंत्र अस्तित्व आहे, याचा प्रारंभी तरी विचार करताना दिसत नाही·

व्यावसायिक यशामुळे जयसिंगमध्ये एक प्रकारचा अहंकार बळावला आहे· हा अहंकार घेवूनच तो कुटुंबात स्वच्छंदीपणे व एकाधिकारशाहीने वावरतो आहे· आपल्या मतानुसार व मनानुसार घरातले व्यवहार चालले पाहिजेत ही त्याची धारणा आहे· या त्याच्या पुरूषी वर्चस्वाच्या वृत्तीमुळे सरिताचा कोंडमारा होत असतो· सरिताला आपल्या

गुलामगिरीची जाणीव प्रकर्षाने व्हावी असा एक प्रसंग घडतो, तो म्हणजे कमलाचे कटुंबातील आगमन· सरिता कमलाकडे माणूसकीच्या नात्याने पाहते तर जयसिंग व्यवसायाचा एक भाग म्हणून कमलाकडे पाहतो· "कमला"बाबत जेवढी गुप्तता बाळगता येईल तेवढी जयसिंग बाळगतो· "आज या देशात या घटकेला माणसांचा बाजार चालतो· बायकांचा उघड लिलाव होतो" हे सिध्द करण्यासाठी जयसिंगने बिहारमध्ये रांची पलिकडे लुहारडागा येथे चालत असणा-या बाजारातून कमलाला दोनशे पन्नास रूपयात खरेदी केलेली असते·[६] तिला पत्रकार परिषदेमध्ये पेश करून त्याला खळबळ उडवून द्यायची असते· तो पर्यंत हे कुणाला कळता कामा नये याची कबुली तो सरिताकडून घेतो·[७] काकासाहेबांनासुध्दा या गोष्टीचा तो सुगावा लागू देत नाही· काकासाहेब मात्र "कुठवर आलं तुझं कटकारस्थान?[८] असे विचारून "माझी अडचण होईल तेव्हा न संकोचता सांग"[९] असा समजूतदारपणा दाखवितात· काकासाहेब जयसिंगच्या पत्रकारितेवर काही आक्षेप घेतात· त्यातून प्रसंगी वाद-विवादही होतात· जयसिंगाने आपल्या व्यवसायाच्या व सुरक्षितेच्या दृष्टीने कमलाला अनाथाश्रमात धाडायचे ठरविलेले असते· सरिताला मात्र हे पटत नाही· तेव्हा जयसिंग, शिक्षा होवून तुरूंगात गेलेल्या व तेथे अधिक आनंदी असलेल्या आदिवासी बायांच्या मुलाखतीचा संदर्भ देवून, कमलाबाबत उगाच हळवेपणाने विचार न करण्याचा सल्ला देतो,[१०] आणि त्यानंतर कमलाला पत्रकार परिषदेत सादर करण्यासाठी तो कमलासह बाहेर पडतो· येथे नाटकाचा पहिला अंक संपतो·

जयसिंगने कमलाला पत्रकार परिषदेमध्ये पेश करून धमाल उडवून दिलेली असते· तेथे कमलाला वेडेवाकडे असभ्य प्रश्न विचारले जातात· कमलाचे जे हसे होते, त्याबद्दल काकासाहेब आणि सरिता तीव्र शब्दात नापसंती व्यक्त करतात· एका उपेक्षित स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन येथे प्रत्ययास येतो· प्रेस कॉन्फरन्सच्या नावाखाली "एका बाईचा बाजार केलास"[११] अशा उपरोधिक शब्दात काकासाहेब आपली प्रतिक्रिया नोंदवतात· त्यावर जयसिंग उसळून व आवाज चढवून काकासाहेबांना ते विधान मागे घ्या म्हणतो·[१२] काकासाहेब क्षमा मागून वातावरण शांत करतात· जयसिंगने काकासाहेबांचा केलेला अपमान सरिताला रूचत नाही· तिचे मन कमलाभोवती घोटाळते आहे· जयसिंगने प्रणयभावनेतून केलेली शरीराची मागणी पुरी न करता सरिता निघून जाते· तेव्हा "नवरा आहे मी तुझा··काय असं गैर मागितलं मी"[१३] असे म्हणून जयसिंग पुरूषी हक्क दाखवितो·

सरिता मंद प्रकाशात एकटीच बसली असताना तेथे हलक्या पावलांनी कमला

येते· "कमला पळून तर चालली नाही ना?" अशी शंका तिला येते·[१४] सरिताच्या आवाजाने ती दचकते· त्यानंतर दोघींच्यात घरदार, मुलबाळं याविषयी संवाद होतो· "तुम्हे कित्तेमे खरीदा "[१५] या कमलाच्या प्रश्नाने सरिता चक्रावून जाते· स्वतःला सावरत "सातसौ मे"[१६] असे उत्तर देते· "सौदा भौती महंगा पडा, बीवीजी सात सौ कल्दार गिन्ने बाद बाल-गुपाली ना होए तो"[१७] अशी कमला खंत व्यक्त करते· "मातृत्व" हेच स्त्री जीवनाचे सार्थक मानणारी कमला, एक सामान्य स्त्री आहे· मातृत्वाची ही जबाबदारी आपल्यावर घेवून कमला, मालकाबरोबर राहण्याची व मालकीहक्काची वाटणी करते· सरिताला कमलाचा राग येत नाही· तिला राग आलेला असतो तो जयसिंगच्या वागण्याचा· कारण जयसिंगने कमलाची सोय नारीनिकेतनमध्ये करावयाचे ठरविलेले असते· जयसिंगच्या मते, कमलाला खरेदी करणं हा पोलिसांचा लेखी गुन्हा असल्याने त्याबद्दल शिक्षाही होवू शकते· परंतु सरिताला जयसिंगच्या व्यवसायतली गुंतागुंत माहित नसते· तिला फक्त दिसते असते कमला· एक असहाय्य कमला· कमलाबाई जशा घरकामाला आहेत तशीच कमलाही राहील, हा सरिताचा बेत जयसिंग धुडकावून लावतो· कमलाला तो घेवून जावू लागतो तेव्हा सरिता पुन्हा विरोध करते· सरिताचा आग्रह पाहून जयसिंग खडसावून विचारतो, "हे असं कोणी ठरवलं?[१८] सरिताही "मी ठरवलं"[१९] असे ठामपणे सांगते· तेव्हा जयसिंग "डोकं ठिकाणावर आहे ना तुझं?"[२०] असे म्हणून तिला सुनावतो की, "इट्स आय हू टेक्स डिसिजन्स इन धिस हाऊस अँड नो वन एल्स··कळलं१"·[२१] कमलाच्या हाती बोचक देवून जयसिंग तिला अनाथाश्रमात घेवून जातो· इथे सरिताला हा आपला पराभव वाटतो· ती सर्द होते· "जयसिंगच्या बुध्दिबळात कमला हे फक्त प्यादं आहे"·[२२] असे म्हणून काकासाहेब तिची समजूत काढू पाहतात· त्यावर सरिता सांगते,"एकटी कमला नव्हे काकासाहेब मी सुध्दा·"[२३] सरिता आपल्या अंतःर्मनातील दबलेल्या वेदनेला वाट करून देते·

कमलाची नारी निकेतनमध्ये सोय लावून जयसिंग संध्याकाळी घरी परत येतो· सरितासह एका पार्टीला जायचे त्याने ठरविलेले असते· सरिताने कमलाविषयी केलेल्या चौकशीकडे दुर्लक्ष करून तो तिला पार्टीला उशीर होत असल्याचे सांगतो· सरिता पार्टीला यायला नकार देते· जयसिंगच्या मनमानी वृत्तीला तिने केलेला हा विरोध असतो· परंतु जयसिंग तिची विशेष दखल न घेता एकटाच निघून जातो· यानंतर सरिताच्या अंतर्मनातून कल्लोळ उफाळून वर येतो· ती काकासाहेबांना आपण प्रेस कॉन्फरन्स घेवून

दिल्ली शहरात गुलाम बाळगणारा माणूस सादर करणार असल्याचे सांगते· "जयसिंग जाधव हा माणूस स्वातंत्र्याचा मोठा कैवारी आहे आणि हा गुलाम आणून वापरतो· गुलामसुध्दा माणूस असतो हे याला मान्य नाही· हा त्याला उपयोगाची वस्तू मानतो· उपयोग झाला की खुशाल फेकून देतो· हा जुलुमाचा कट्टर विरोधक म्हणवतो· पण पदरच्या गुलामावर हा वाटेल तो जुलुम करतो आणि त्याचं याला काहीसुध्दा वाटत नाही··· कमला नावाच्या गुलामाला यानं विकतं आणून कसं वापरलं त्याची ऐका कहाणी···दुसरा गुलाम तर बोलून चालून फुकट मिळालेला· गुलामाच्या बापानंच मोठी रक्कम मोजलेली· त्याचं यानं काय केलं ते ऐका··"[२४] जयसिंगची हेटाळणी करताना तिला हुंदका येतो· जयसिंग खुद्द आपल्याला खलनायक वाटत असल्याचे ती काकासाहेबांना सांगते· "आजवर जागी असून गुंगीत असणा-या मला कमलाने खडबडून जागे केले, आपण बायको नाहीतर नव-याचे एक गुलाम आहोत· या घरात गुलाम असल्यामुळे आपल्याला कसलाही हक्क नाही· धन्याच्या इच्छेप्रमाणे हसायचं-रडायचं· फोन घे म्हटलं की घ्यायचं· पार्टीला चल की चलायचं··बिछान्यावर पड की··"[२५] अशा शब्दात सरिता आपली गुलामगिरीची जाणीव व्यक्त करते·· तिची मागणी माणसाच्या लायकीनं जगण्याची असते· "पुरूषार्थ करतो तो पुरूष मग त्याचं लिंग कोणतं का असेना?"[२६] ही तिची पुरूषार्थाची व्याख्या असते· याबाबत ती आपल्या भावना काकासाहेबांकडे व्यक्त करते·· सरिताच्या रूपाने एका आत्मनिर्भर झालेल्या स्त्रीचे रूप तेंडुलकरांनी प्रभावी व परिणामकारकतेने उभे केले आहे·

आत्मनिर्भर झालेली सरिता, जयसिंगला नोकरीवरून कमी केल्याच्या बातमीने स्तिमित होते· जयसिंगने ज्या माणसांच्या बाजाराचा शोध घेतलेला असतो, त्यामध्ये भलेमोठे लोक गुंतलेले असतात· त्यांचे हितसंबंध दुखावल्याने मालकाला जयसिंगला कमी करावे लागले असल्याचा खुलासा पत्रकार जैन करतो· पार्टीत गुंतलेल्या जयसिंगला घरी बोलावून ही बातमी सांगितली जाते· ही धक्कादायक बातमी ऐकून जयसिंग कोसळून पडतो· सरिता त्याला सावरण्याचा प्रयत्न करते· याही प्रसंगी ती आपला गुलामगिरीतून मुक्त होण्याचा निर्धार व्यक्त करते, "तूर्त मी ते सगळं मनाच्या एका कप्प्यात बंद करून विसरणार आहे· एक दिवस मी गुलाम असायच्या थांबणार···वापरून फेकण्याच्या वस्तू असणार नाही· माझ्या इच्छेनं मी सर्व काही करीन,पण माझ्यावर कुणीही सत्ता गाजवू शकणार नाही· तो दिवस नक्की येणार आहे· मग त्यासाठी कुठलीही किंमत मला मोजावी लागली तरीही मी मोजेन,"[२७] असा आत्मविश्वास व निर्धार ती व्यक्त करते· त्यानंतर तिचे मन

हेलखावा खाते. ती जयसिंगपाशी येवून त्याच्या पायातले बूट हलकेच काढते. तेथेच खाली बसते. परंतु या प्रसंगी तिची नजर दूरवर भविष्यात स्थिरावली आहे. मुखावर निर्धार आहे. उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी स्वतंत्र वाटचाल करू इच्छिणा-या स्त्रीचा निर्धार तिच्या नजरेतून प्रकट होतो आणि येथेच नाटकाचा पडदा पडतो. "कमला" नाटकाचे कथानक प्रचलित समाजव्यवस्थेतील उच्चमध्यमवर्गीय शिक्षित स्त्रीचे स्थान, तिची मनोभूमिका, आत्मनिर्धार स्पष्ट करून खंबीर अशा परिवर्तनशील स्त्रीचे रूप उभे करते.

प्रस्तुत नाटकातील आशयद्रव्य जाणून घेतल्यानंतर, नाटकातील स्त्री समस्या चित्रणाची मीमांसा सामाजिक अंगाने करणे गरजेचे आहे.

## ××× "कमला" नाटकातील स्त्री समस्या चित्रणाचा सामाजिक अंगाने विचार. ×××

साहित्यकृती ही समाजजीवनाची एक अविभाज्य अंग असते. सामाजिक घटनांचा, समस्यांचा नाटककारावर परिणाम होवून त्या घटना, समस्या नाटकातून मांडल्या जातात. समाजाला त्या समस्यांचे स्वरूप समजावे, समाजाने त्यावर अंतर्मुख होवून विचार करावा, हा नाटककाराचा हेतू असतो. समाजाचे मानसिक परिवर्तन करण्याची शक्ती नाट्यकृतीमध्ये असते. यासाठी सामाजिकदृष्टया नाट्यकृतींची स्वतंत्रपणे चिकित्सा करणे आवश्यक असते. त्यादृष्टीने "कमला" नाटकात चित्रीत केलेली स्त्री समस्या जाणून घेवून, सामाजिक अंगाने विचार करण्याचा हेतू आहे. यासाठी प्रथम भारतीय स्त्रीचे समाजातील स्थान जाणून घेवूया.

काळ बदलला असलातरी काळानुसार सामाजिक रूढी, समजुती, परंपरा, आचारविचार बदलले नाहीत. त्यामुळे जुने मूल्यसंकेत नवीन काळात बंधनकारक ठरतात. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" [२८] हा मनुस्मृतीने घालून दिलेला दंडक स्त्री जीवनाबाबत अन्यायकारक ठरला, तिला गुलामगिरीत बध्द करण्यास कारणीभूत झाला. पूर्वकाळात डोकावले असता, भारतीय स्त्री जीवनाच्या गुलामगिरीची सुरूवात समजून घेता येते. शेतीचा शोध लागला नव्हता, तेव्हा मानव टोळी करून राहात होता. त्यावेळी प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नव्हते. स्त्री ही पुरुषाबरोबर झटून जगत होती. प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी समुदायावर होती. त्यानंतर शेतीचा शोध लागला. त्यातून अहंमन्यतेचा उगम झाला. खाजगी मालमत्ता व तिच्या रक्षणाची कल्पना पुढे आली. या मालमत्तेचा वारस आपला मुलगा असावा

या इच्छेने अपत्याला जन्म देणा-या स्त्रीवर पुरूष मालकीहक्क गाजवू लागला· या प्रक्रियेचा स्त्री जीवनावर प्रतिकूल परिणाम होवून स्त्री दास्याची कल्पना रूजली गेली· डॉ·विमल भालेराव यांच्या मते, "एक दासी या नात्याने वागण्याचे नशिबी आल्याने कन्या, भगिनी, पत्नी, माता या सर्व भूमिकेमध्ये स्त्रियांची फार कुचंबना झालेली दिसते· तिचे दास्यत्व प्रखरतेने जाणवते ते ती कुणाची तरी पत्नी आणि कुणाची तरी सून म्हणून वावरताना·" [२९]

पुरूषापेक्षा स्त्रीचे शारीरिक बळ कमी असल्यामुळे व निसर्ग निर्मित मातृत्वामुळे तिला घरात डांबले गेले· कुटुंब हेच तिचे कार्यक्षेत्र झाले· कष्ट आणि निष्ठा या साखळ्यांनी तिला बांधले गेले· ती पुरूषाची मालकीहक्काची एक उपभोग्य वस्तू बनली· यातूनच तिच्यावर पातिव्रत्याची कल्पना लादली गेली· त्याग,सेवा,सोशिकता या जीवनमूल्यांचे आदर्श तिच्या मनावर ठसवले गेले· स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विचार करण्यापेक्षा, कुटुंबाच्या विचारात सदैव गुरफटणारी, पतिसेवेसाठी सदैव दासीप्रमाणे झटणारी स्त्री आदर्श मानली जावू लागली· भारतीय संस्कृतीच्या परंपरेत पुरूष पराधिनता हा तिचा आदर्श मानला गेला· "चूल आणि मूल" हे तिचे कार्यक्षेत्र ठरवून, समाजाने तिच्याकडून पतिनिष्ठेची, प्रेमाची, सेवेची हक्काने अपेक्षा केली व तशाप्रकारची शिकवण लहानपणापासूनच तिच्या मनावर बिंबवली गेली· तिला बालपणापासूनच "परक्याचे धन" संबोधून हेटाळणी केली· समाजाला अपेक्षित असणा-या आदर्श स्त्रीत्वाचे संस्कार बालमनावर केले गेले· तिच्या सोशिकतेचे, सेवेचे, विनम्रतेचे कौतुक करून एक चाकोरीबध्द जीवन जगायला भाग पाडले· त्या चाकोरीत जगण्यात ती ही स्वतःला धन्य मानू लागली· मनुप्रणीत जीवनमूल्यांच्या चाकोरीतून चालणे हे तिच्या अंगवळणी पडले· डॉ·कल्पना परांजपे म्हणतात, "मनुस्मृतीने स्त्री ला गुलाम बनविले· तिला पायदळी दडपले· इतके की एक उपभोग्य वस्तू एवढीच तिची किंमत राहिली· हे जीवन स्त्रीने न कुरकुरता स्वीकारावे म्हणून पातिव्रत्यासारख्या जीवनमूल्यांची तिला भूल दिली गेली·" [३०]

स्त्री ही एक माणूस आहे· हा विचार मनुस्मृतीने केला नाही· चार भिंतीत डांबून, तिच्यावर दास्यत्व लादून, तिच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा दंडक मनुस्मृतीने घालून दिला· मानवाची कृषिअवस्था ब-याच काळ टिकल्यामुळे मनुप्रणीत जगण्याची रीत तिने निमूटपणे अंगिकारली· ती आपल्या दास्यत्वाविरूध्द आवाज उठवू शकली नाही· याचे कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव· ब्रिटीश राजवटीमध्ये स्त्रीदास्य विमोचनाचा विचार झाला· शिक्षित तरूणांना व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री स्वातंत्र्य, समानता· या नवविचारांचे महत्व

पटू लागले· त्यादिशेने त्यांनी प्रयत्न केले· समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, चाली यांच्या विरूध्द आवाज उठविला· समाजसुधारकांनी बालविवाह, सती, केशवपन. सारख्या रूढी परंपरांच्या बंधनातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी लढा दिला· स्त्रियांच्या दु:स्थितीकडे लक्ष देवून समाजसुधारणेचे एक आंदोलन उभे केले· स्त्रियांची पिळवणूक, त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण, त्यांच्यावर पुरुषी अमानुषतेचे लादण्यात आलेले चिरदास्यत्व, संस्कृतीच्या दांभिक आवरणाखाली बळी पडणा-या स्त्रीचा मूक टाहो मा·फुलेंनी ऐकला· स्त्री जीवनाची व्यथा स्पष्ट करून, प्र·श्री·नेरूरकर, म·फुलेंच्या क्रांतिकार्याचा गौरव करताना म्हणतात, "भारतीय नारीचे समग्र दु:ख, तिचे दैन्य, तिची एक पुरुषाच्या केवळ वासनापूर्तीची लिंगबाहुली म्हणून करण्यात आलेली दैना, तिचा अमानुष छळ, अनैसर्गिक अशा बालवयातच तिच्यावर मांगल्यांचा धर्ममंत्रगात लादण्यात आलेले मातृत्व व त्याबरोबर बालवैधव्य, तिला संपूर्ण समाजरचनेत देण्यात आलेली पाचवी अतिशूद्राची जागा आणि अशा रीतीने चातुर्वर्ण्याचा करण्यात आलेला मानवशोषणयुक्त दुष्ट विकास, याची अनुभूती जोतीरावांनी सहृदयतेने घेतली व संपूर्ण मानव मुक्तीच्या आपल्या महान जीवनकार्यात स्त्री-मुक्तीच्या कार्यक्रमाला त्यांनी अग्रस्थान दिले·" [११]

स्त्री शिक्षणाच्या बाबतीत म·फुलेंनी युगप्रवर्तक कार्य केले· अज्ञान हेच स्त्रीच्या अन्यायाला व दास्याला कारणीभूत आहे, नव्या जाणीवेने विचार करण्यासाठी तिला शिक्षित केले पाहिजे, हे म·फुलेंनी ओळखले· त्यानंतर आगरकर, महर्षि कर्वे यांनी स्त्री सुधारणेसाठी मोलाचे कार्य केले· याठिकाणी लोकहितवादींच्या स्त्रीविषयक कार्याचेही स्मरण केले पाहिजे· त्यांनी स्त्री-पुरुष यांना समान स्वातंत्र्य असलेली भूमिका घेवून शतपत्राव्दारे स्त्रियांच्या प्रश्नावर परखड विचार मांडले· जागरूकपणे समाजस्थितीचे अवलोकन करून, समाजाच्या सर्वांगीण पुनर्रचनेचा पुरोगामी विचार प्रखरपणे व धारदार शब्दांनी मांडणा-या लोकहितवादींचा "एक क्रांतदर्शी विचारवंत" असा गौरव करून डॉ·मंदा खांडगे आपल्या, "शतपत्रांतून जाणवणारी स्त्री" या लेखात म्हणतात, "विचार संक्रमणाच्या काळात त्यांनी उचललेले पाऊल स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचं होतं· आज पुष्कळ अंशी मुक्त झालेल्या, शिक्षणानं स्वत:च्या पायावर उभं राहून अर्थार्जन करणा-या, समान हक्क मिळविण्याठी झगडणा-या, वैचारिक दृष्टीने प्रगत झालेल्या स्त्रीचं चित्र लोकहितवादींनी एकोणिसाव्या शतकातच आपल्या डोळ्यापुढं उभं केलं होतं·" [१२]

आपल्या समाजातील अनेक रूढी, परंपरा या स्त्रियांना योग्य न्याय देणा-या नाहीत. स्त्रीला शिक्षण व स्वातंत्र्य द्यावे यासाठी कुटुंबाची, समाजाची मनोभूमिका अनुकुल नव्हती. या प्रतिकूल परिस्थितीवर प्रहार करीत ज्या स्त्रिया शिक्षणाच्या पाऊल वाटेने गेल्या, त्यांना कुटुंबाशी, समाजाशी संघर्ष करावा लागला. सामाजिक परिवर्तनासाठी हा संघर्ष अटळ होता, स्त्री शिक्षण व स्त्री स्वातंत्र्य हे बदलत्या काळाची गरज आहे हे ओळखूनच समाजसुधारकांनी पुढाकार घेतला होता. "सामाजिक परिवर्तनास कुटुंबसंस्थेत व विवाह संस्थेत बदल करण्यापासून खरा प्रारंभ होतो आणि त्याकरिता स्त्रीशिक्षण व स्त्री स्वातंत्र्य यांचा पुरस्कार पहिल्यांदा केला पाहिजे" हे पाश्चात्य सुधारणा प्रवाहाचे एक सर्वसंमत वैशिष्टय होते, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या "हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीच्या विरूध्द बंड पुकारणारा पहिला पुरूष : जोतीराव फुले" या लेखात नमूद करतात.[३३]

शिक्षणाच्या अभावी अंधारात चाचपडणा-या स्त्रीला, समाजसुधारकांनी ज्ञानाच्या उजेडात आणून नव्या जगाची ओळख करून द्यायला सुरूवात केली. स्त्रिया स्वतःचा माणूस म्हणून विचार करू लागल्या. नवीन जीवनमूल्यांची, हक्कांची, स्वातंत्र्याची, स्वतःच्या अस्मितेची त्यांना जाणीव झाली. स्त्री जीवनाची मनूप्रणीत रीत हळूहळू बदलू लागली. परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली. ती आजही चालूच आहे. काही स्त्री समस्या कालबाहय झाल्या असल्यातरी शिक्षित स्त्रीच्या काही नवीन समस्या उद्भवलेल्या दिसतात. पारंपरिक मूल्यांना नकार देवून नवीन जीवनमूल्य स्वीकारण्यासाठी आत्मबळाने, धाडसाने पुढे येणा-या स्त्रिया आढळतात. स्त्रीविषयक समस्यांची व परिवर्तनाच्या प्रक्रियेची नोंद मराठी नाटककारांनी घेतली. मराठी रंगभूमीचा इतिहास पाहता, मराठी नाटककारांनी आपल्या काळातील स्त्री समस्या प्रभावीपणे चित्रीत करून समाजमनाला विचारप्रवृत्त केले. बदलत चाललेल्या स्त्रीचे रूप चित्रीत करून नवविचारी स्त्रीचे दर्शन घडविले आहे. तेंडुलकर समकालीन नाट्यसृष्टींचा प्रातिनिधिक स्वरूपात विचार करता, श्री.रा.बिवलकरांच्या "**वैदेही**" ﴾**१९६०**﴿ मधील स्वतंत्र विचारांची "**मंदा**", वसंत कानेटकरांच्या "**घरात फुलला पारिजात**"﴾**१९७०**﴿ मधील, पतीची सावली म्हणून नव्हेतर साथी म्हणून पोलिस अधिकारी पतीला-लाल्याला पाठबळ देणारी व पातिव्रतेचे नवे मूल्य जोपासणारी जिद्दी "**चंद्रलेखा**", कानेटकरांच्याच "**पंखाना ओढ पावलांची**" ﴾ **१९८१** ﴿ मधील आपल्यावर नव-याचा मालकीहक्क गाजवून न घेणारी व स्वतः स्वतंत्रपणे निर्णय घेवून आपल्या आवडीचे समाजकार्य करणारी "**साधना**"

ह्या स्त्रिया, नवविचारी स्त्रीचे दर्शन घडवितात· गडक-यांच्या **"एकच प्याला"** मधील सिंधूप्रमाणे त्या पारंपरिक वळणाच्या स्त्रिया नाहीत· त्यांच्या जाणीवा प्रगल्भ झाल्याने त्या स्वतःच्या जीवनाचा विचार करू शकतात· खंबीरपणे निर्णय घेवू शकतात· यासाठी समाजाशी, कुटुंबाशी संघर्ष करावा लागला तरी, त्यासाठी आवश्यक असणारे आत्मबळ, वैचारिक बैठक, जिद्द, धाडसीवृत्ती त्यांच्या ठायी आहे, त्यांना आत्मभान आल्याने त्या स्वतःचे व्यक्तिमत्व जाणून, तशा पध्दतीने घडवू शकतात· हेच या स्त्री चित्रणातून स्पष्ट होते· अलिकडे मोठया प्रमाणात प्रयोग होत असलेल्या प्रशांत दळवी यांच्या **"चारचौघी"** ﴾ १९९१﴿ नाटकात स्वतंत्र विचारांच्या व कणखर वृत्तीच्या स्त्रियांचे अतिशय प्रभावी दर्शन घडते·

"एकीकडे स्त्रीने स्वतःच्या आयुष्याचं काय करायचं याच्या निर्णयाची अशी आपल्याच हाती घेतलेली सूत्रं, तिचा वेगाने पुढे जाण्याचा प्रयत्न तर दुसरीकडे समाजमनाचा मात्र मंदगतीने विकास होत असल्यानं सामाजिक दबावांचा रेटा अधिकाधिक वाढतं जाणं· यातून निर्माण होणा-या संघर्षात, कोंडीत सापडलेल्या अनेक आधुनिक विचारांच्या स्त्रियांच अस्तित्व मला भोवताली जाणवू लागलं· त्यांची अशा स्थितीतही खचून न जाता, नशिबाला दोष न देता झगडण्याची ताकद मला अवाक् करू लागली· त्यातूनच "चारचौघी" तील संघर्षाची बीजं मनात रूजली" अशी लेखननिर्मितीमागची भूमिका श्री दळवी मनोगतात व्यक्त करतात·[२४] या नाटकातील "आई" स्त्री समस्येबाबत मार्मिक भाष्य करते·" मुळात स्त्री-पुरूष असमानता हाच सगळ्या समस्यांचा पाया आहे· बायको ही फक्त सौंदर्यानं चांगली हवी· बाकी विव्दतेपासून अगदी वयापर्यंत ती नव-यापेक्षा सगळ्या बाबतीत खुजी असावी ही आपल्या समाजाची अपेक्षा·"[२५] या नाटकातील स्त्री-समस्येवर भाष्य करताना डॉ·वि·भा·कुलकर्णी म्हणतात, "चारचौघीसारखे नाटक जेव्हा एका वर्षात मोठया प्रमाणात प्रयोग करून लोकापर्यंत जाते तेव्हा त्याचा अर्थ नक्कीच आहे की, त्यातल्या स्त्रियांचे प्रश्न हे केवळ त्या व्यक्तिंचे प्रश्न नाहीत· ते जितके व्यक्तिगत आहेत तितकेच ते आजच्या समाजातले अनेकांचे आहेत· परंपरेपेक्षा वेगळया वाटेने जावून जीवनप्रश्नांच्या अनुभवांचा धांडोळा प्रायोगिक रंगभूमीच्या रंगकर्मींनी घेतला· नाट्य माध्यमातून आपल्याला जे मांडायचे आहे ते धीटपणाने, थेटपणाने मांडले·"[२६]

तेंडुलकरांच्या "कमला" नाटकाचा विचार करता, पारंपरिक मूल्यापेक्षा नव जीवनमूल्ये घेवून जगू पाहणारी, स्वयंनिर्णय घेवून स्वतःचा स्वतंत्र विचार करणारी स्त्री सरिताच्या

रूपाने चित्रीत केली आहे. स्वतःच्या अस्मितेची जाणीव झालेल्या स्त्रीचे दर्शन तेंडुलकर घडवितात. सरिताच्या चित्रणातून ते स्त्रीच्या व्यथा जाणून घेवून, तिच्या अंतर्मनाचा शोध घेतात. याबरोबरच ते आजच्या समाज वास्तवाचे, सामाजिक अन्यायाचे दर्शन कमलाच्या रूपाने घडवितात. डॉ. मधुरा कोरान्ने "आधुनिक मराठी सामाजिक नाटकामधील स्त्री विषयक समस्यांचे स्वरूप" या लेखात नमूद करतात की, "पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान कोठे आहे या प्रश्नाचे उत्तर नेमकेपणाने देता येणार नाही. स्त्रीची खरेदी-विक्री होते. किंबहुना बाजारातल्या एखाद्या वस्तूसारखी स्त्री ची विक्री होते. स्त्रीला गुलामासारखी वागणूक मिळते. ही वस्तुस्थिती आहे. **"कमला"** या नाटकाव्दारे विजय तेंडुलकरांनी या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला आहे." [१७]

जयसिंग जाधव, सरिता, कमला, काकासाहेब, कमळाबाई या पाच पात्राभोवती हे नाटक फिरते. त्यातील जयसिंग जाधव हा धाडसी व महत्वाकांक्षी पत्रकार असल्याने समाजात त्याचा सर्वत्र वावर आहे. पत्रकारितेत त्याने पुष्कळ यश व नावलौकिक कमविला आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून, साहसीवृत्तीने तो सामाजिक अन्याय उघड करण्यासाठी अग्रेसर राहतो. प्रस्तुत नाटकात त्याने ज्या सामाजिक घटनेचा शोध घेतला आहे ती घटना चित्तथरारक तर आहेच, परंतु स्त्रीवर अन्याय करणारी आहे. मानवतेला कलंक लावणारी आहे. बिहारमध्ये रांची पलिकडे लुहारडागा येथे माणसांचा बाजार चालतो. तेथे बायकांची विक्री केली जाते. हे जयसिंग ऐकून असतो. त्यासंबंधी तो वृत्तपत्रातून लिहीतो. परंतु त्याला ठोस पुरावा उपलब्ध झालेला नसतो. मिळालेल्या माहितीच्या आधारावर तो पोलिसखाते, गृहमंत्री यांच्याशी संपर्क साधतो. ते कानावर हात ठेवतात. त्यांच्याकडून खात्रीलायक माहिती मिळणे दूरच राहते. परंतु ते, वृत्तपत्रवाले खोटे लिहितात असा आरोप करतात. जयसिंगला याची चीड येते. तो जिद्दीने कामाला लागतो. सामाजिक वास्तवाचा, अन्यायाचा विश्वासनीय व सनसनाटी वृत्तान्त देण्याच्या प्रेरणेतून, जंगजंग पछाडून त्या माणसांच्या बाजाराचा शोध घेतो, त्याला खरोखरच लुहारडागा येथे माणसांचा बाजार चाललेला दिसतो. तेथे वेगवेगळ्या बायकांचा उघड लिलाव होत असतो. लिलाव बोलण्यासाठी दूरदूरहून लोक येत असतात. लिलाव बोलणारे इच्छुक बायका हाताळून आदमास घेतात. भरीव आहे का थुलथुलीत, तरूण आहे का वयावरची. बरी आहे का रोगी. स्त्रीची सर्वांगीण तपासणी करून तिला विकत घेणा-या त्या बाजारात कमलाला गि-हाईक नसल्याचे जयसिंग सांगतो. मुंडी खाली घालून ती एकीकडे बसून होती.

या द्देशात या घटकेला माणसांचा बाजार चालतो हे पुराव्यानिशी सिध्द करावे या हेतूने जयसिंग कमलाला दोनशे पन्नास रूपयात खरेदी करतो व घरी घेवून येतो·

कमलाला पत्रकार परिषद्देपुढे प्रेश करून सामाजिक वस्तुस्थितीची जाणीव करून द्यावी, या उद्देशाने जयसिंग कमलाची समस्या मांडून खळबळ उडवून देतो· परंतु हे करत असताना कमलाचे पत्रकार परिषदेमध्ये जे हसं होतं त्याबद्दल सरिता व काकासाहेब नाराजी व्यक्त करतात· जयसिंग आणि त्याचा पत्रकार मित्र जैन ज्यापध्दतीने व दृष्टीने कमलाकडे पाहात असतात, तो सामाजिकतेप्रेक्षा पत्रकारितेतील यशाला प्राधान्य देणारा असतो· स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेणा-या जयसिंगला आपल्या कामगिरीबद्दल अभिमान व आनंद वाटत असतो· जैन त्याला प्रतिसाद देवून त्याचे कौतुक करीत असतो· पत्रकार परिषदेनंतर घरी राहिलेल्या कमलाशी सरिता आस्थेने संवाद साधते· कमलाच्या "तुम्हे कित्तेमे खरीदा?"[३८] या प्रश्नाने सरिता गोंधळून जाते· मालकाला खुश करण्यासाठी कमला जे जे सांगते, ते ऐकून सरिता चक्रावून जाते·

सरिता ही नव-याच्या कर्तृत्वात, त्याच्या सुखात आपले सुख मानणारी, स्वतःला विसरून पतीसेवेसाठी सदैव तत्पर असणारी, आपल्या गुलामगिरीची स्पष्ट जाणीव न झालेली एक उच्च मध्यम वर्गीय शिक्षित स्त्री आहे·· कमलाच्या आगमनानंतर व तिच्या संदर्भात जयसिंगशी झालेल्या संघर्षानंतर ती स्वतःचा शोध घेत जाते· आपल्या घरात आपले स्थान गुलामापेक्षा वेगळे नाही; ही वस्तुस्थिती तिच्या लक्षात येते·

सरिताचा कमलाकडे माणूसकीच्या नात्याने पाहण्याचा दृष्टिकोन उक्ती-कृतीतून प्रकट झालेला दिसतो· घरात आलेल्या कमलाला चहा देणे, तिला नेसायला आपल्या साड्या देणे· हे प्रसंग साधे आहेत· पण हा साध्या साध्या प्रसंगातून तिची कमलाविषयीची आस्था दिसते· कमलाला अनाथाश्रमात ठेवायचा, जयसिंगने घेतलेला निर्णय तिला अमान्य आहे· जयसिंग आपल्या जगातील गुंतागुंत तिला सांगतो· त्यामुळे कमलाला, कमळाबाईसारखे घरात ठेवून घेण्याचा सरिताचा निर्णय तो अमान्य करतो· सरिता अगदीच हट्ट करायला लागते तेव्हा तो तिला खडसावून सांगतो, "इटस् आय हू टेक्स डिसिजन्स इन धिस हाऊस· अॅन्ड नो वन एल्स· कळलं?"[३९] म्हणजे या घरात माझे राज्य आहे· तेव्हा निर्णय मी घेणार या हुकुमशाहीवृत्तीने तो कमलाला नारी निकेतनमध्ये घेवून जातो· सरिताने जयसिंगशी केलेल्या संघर्षाला माणूसकीचे परिमाण आहे· पण सरिताच्या मनाची दखल

न घेता, जयसिंग कमलाला अनाथाश्रमात दाखल करतो, तेव्हा सरिता मनातून दुखावली जाते· अस्वस्थ होते· जयसिंगला मात्र त्याचे काही विशेष वाटत नाही· सरिताचा विरोध विसरून तो कमळाबाईकरवी सरिताला पार्टीसाठी तयार व्हायला सांगतो· सरिता कमलाची विचारपूस करते· परंतु तेथेही तो गांभीर्याने सरिताचे म्हणणे ऐकून न घेता, पार्टीला उशीर होत असल्याची तिला जाणीव देतो· सरिता पार्टीला यायला नकार देवून आपली नाराजी व्यक्त करण्याचा प्रयत्न करते· अशा स्थितीतही जयसिंग तिच्या मनस्थितीची विशेष दखल न घेता, एकटाच पार्टीला निघून जातो· सरिता अंतर्मुख होवून विचार करायला लागते· नव-याच्या इच्छेप्रमाणे वागायचं, त्यानं हसं म्हटल की हसायचं, नाचायच, रडायचं· फोन घे म्हटलं की घ्यायचा, पार्टीला चल म्हटलं की चलायचं· त्याच्यासाठी राबायचं, घरात कसलासुध्दा अधिकार नाही· स्वतःच्या मनाला किंमत नाही· ही चक्क दडपशाही आहे याची तिला तिव्रतेने जाणीव होते· स्त्रीने पुरुषामागे, पुरुषासाठी फरफटतं जायचं जीणं का जगायचं? असा प्रश्न तिला पडतो· काकासाहेब सरिताजवळ जयसिंगच्या कर्तृत्वाचा, पुरूषार्थाचा उल्लेख करून, "पुरुष म्हटलं की आपल्या कर्तृत्वाचा अहंकार असायचाचं" सांगतात·[४०] जयसिंग पराक्रमी आहे, त्याने आपल्या क्षेत्रात नाव कमवले आहे, त्याने जे मिळवलयं ते स्वतःच्या हिंमतीवर मिळवलयं."म्हणून त्याला गुलाम ठेवायचा हक्क काय म्हणून?"[४१] असा आवेगाने सरिता प्रश्न उभा करते· आपली खंत ती व्यक्त करताना मार्मिक प्रश्न उभे करते, "माणूस मोठा होतो तर तो मोठा माणूस का नाही होत? त्याचा मालक का होतो?·· पुरुषानं काय म्हणून नाही फरफटायचं? बाईनं काय म्हणून नाही एकदा तरी मालक बनायचं? निदान तिनं काय म्हणून नाही माणसाच्या लायकीनं जगू मागायचे? पुरूषार्थ करण्याचा हक्क काय तो पुरूषालाच काय म्हणून? सरिताचे प्रश्न पाहता, स्त्री ही विशिष्ट मूल्ये घेवून उभी राहू शकते, हा विचार ही नाट्यकृती सुचवित आहे· या कलाकृतीतील अनेक संदर्भ आपल्याला हेच सांगत आहे की, माणूस मोठा होतो तसा तो मोठा माणूसही होणे आवश्यक आहे·

आजच्या स्त्रीला समर्थपणे, डोळसपणे आपले जीवन जगता आले पाहिजे· ती कितीतरी जोखडातून, बंधनातून बाहेर पडली पाहिजे· तेव्हाच तिला माणूस म्हणून सन्मानाने जगता येईल· "स्त्रियांना आपल्या भूमिका पार पाडण्यासाठी एकीकडून राज्याने उपलब्ध करून दिलेले हक्क आणि संधी व दुसरीकडून समाजातील सामाजिक-सांस्कृतिक संस्थानी

प्रदान केलेले हक्क व संधी यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ब-याचदा या दोन बाजूनी मिळणारे हक्क व संधी ह्या परस्पर सहाय्यक नसल्याचे आपल्या ध्यानातही येते. परिस्थितीत घडून येणा-या परिवर्तनाच्या विविध प्रक्रियेमुळे भूमिकेबद्दलचे अपेक्षित वर्तन व प्रत्यक्षात घडून येणारे वर्तन यात तफावत निर्माण होते."[४२] अशाप्रकारचे मत, भारतीय समाजातील स्त्रीच्या स्थानाची पाहणी करण्यासाठी नेमलेल्या राष्ट्रीय समितीने सादर केलेल्या अहवालात नोंदवले आहे.

सरिताला कौटुंबिक पातळीवर देखील समानतेचे हक्क लाभत नाहीत. कमलाच्या गुलामगिरीचा प्रश्न सामाजिक जाणीवेने मांडून स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेणारा जयसिंग घरात मात्र सरिताच्या मत-स्वातंत्र्याची कदर करीत नाही. आपल्या मताला व मनाला काहीच किंमत नसल्याचे तिच्या लक्षात आल्याने, आपण जयसिंगची बायको नसून गुलाम असल्याचे तिला वाटते. आजवर निमूटपणे जगत असलेल्या सरिताला कमलामुळे जाग येते. ती म्हणते, "मी जागी असूनही गुंगीत होते. कमलानं मला जागं केलं. खडबडून जागं केलं. कमलानं मला सगळं दाखवून दिलं. तिच्यामुळे मला स्वच्छ दिसलं की ज्याला मी जोडीदार मानला तो गुलामाचा मालक आहे."[४३]

जोडीदार म्हणून आजची स्त्री काय अपेक्षा करते हे पाहणेही महत्वाचे आहे. सरिताचा जो अपेक्षाभंग झाला आहे, त्याची कारणे आपणच शोधलीत. जयसिंगचे मनमानी वागणे व आपल्याला पाहिजेल तसे पत्नीला वागवणे, यातून सरिताची समस्या उभी राहते. विवाहामुळे जोडीदार म्हणून जे दोन स्त्री-पुरुष एकत्र येतात, त्या दोघांनाही मनातून आपण एकमेकांचे आहोत, एकमेकांच्या मनाचा विचार करतो आहोत, अशी आश्वासक जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. जयसिंग मात्र असा जाणीवपूर्वक विचार करताना दिसतं नाही. पुरुषप्रधान संस्कृतीने घालून दिलेल्या वाटेनेच तो जाताना दिसतो. सरिताला दुय्यम समजतो. "स्त्रियांना मिळणारं दुय्यम स्थान म्हणजे समाजाच्या हाडीमाशी रूजलेला रोग आहे"[४४] अशी कडवट प्रतिक्रिया डॉ.भागवत व्यक्त करतात. नवरा बायकोमध्ये मैत्रीचे, आस्थेचे, आदराचं आणि विश्वासाचं नातं निर्माण व्हायचं तर स्त्रिया आणि पुरुषांना लहानपणापासून समानसंधी मिळाली पाहिजे,[४५] असे डॉ.भागवतांना वाटते ते योग्यच आहे. अशी समानसंधी कुटुंबात सुरुवातीपासून लाभली तर, पुढे पती-पत्नी म्हणून एकत्र येणारे स्त्री-पुरुष, एकमेकांच्या मनाचा विचार करून निर्णय घेतील. एकमेकांच्या मताची कदर झाल्याने एकमेकाबद्दल आदर वाढीस लागेल. परंतु पुरुषप्रधान संस्कृति

LIBRARY

असा समानपातळीवर संवाद साधून सर्वांना समानतेची वागणूक मिळत नाही. पुरुष म्हणून पुष्कळ सवलती व अधिकार मिळतात, त्यातून साहजिकच पुरुष वरचढ ठरतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विवाहानंतर तो पत्नीला आपल्या जीवनातील जीवाभावाची सोबती न मानता, राबती दासी म्हणून वागणूक देतो.

"विवाह व कुटुंब या समाजाला स्थैर्य व आकार प्राप्त करून देणा-या प्राचीन सामाजिक संस्था आहेत. त्या मानवी आयुष्याला स्थैर्य, जिव्हाळा, मानसिक व भावनिक आधार व सुरक्षितता मिळवून देण्यास मदत करतात. घरातील वातावरण घुसमटून टाकणारे असेल, स्त्रीला साशंक बनविणारे असेल तरी समस्या निर्माण होतात"[४६] असे मत डॉ. आशा परूळेकर आपल्या **"आधुनिक स्त्री च्या समस्या"** या ग्रंथात नोंदवितात. विवाह आणि पती-पत्नीचे नाते या संदर्भात वीणा आलासे यांचे विचारही समर्पक वाटतात. त्यांच्या मते, "विवाह हा शब्दाचा अर्थच विशेष वहन असा आहे आणि विशेष वहन करणे म्हणजे केवळ अन्न, वस्त्र, निवारा नव्हेतर परस्परांच्या व्यक्तित्व विकासाला वाव देणे. त्यात येणारे ताणतणाव साहचर्याने झेलणे आणि कुठल्याही परिस्थितीत परस्पराबद्दल आदर व शुभेच्छा न हरविणे असा होतो."[४७] आदर व शुभेच्छा हरवून त्या जागी जेव्हा तुच्छता येते, तेव्हा संसाराचा सूर हरवला जातो. सरिता स्वतंत्रपणे जगण्याचा विचार बोलून दाखविते त्याचे कारण हेच आहे. आपल्याच संसारात आपल्या मनाचा आदर नाही, आपल्याला वाव नाही, समभाव नाही. केवळ पतीच्या आज्ञेत राहून त्याने सांगितल्याप्रमाणे वागायचे, असे पारंपरिक जीवन वाटयाला आल्यानेच तिची प्रतिक्रिया उमटते, "या घरात मला कमला इतकासुध्दा हक्क नाही. कारण मी गुलाम आहे. गुलामांना हक्क नसतात....त्यांनी फक्त राबायचं, धन्याच्या इच्छेप्रमाणे नाचायचं."[४८] सरिताच्या मनातला हा असंतोष आपली स्वतःची वेगळी वाट शोधायला लागतो. आपले गुलामीचे जीणे फेकून देवून स्वतःच्या इच्छेने जगण्याचा निर्धार ती व्यक्त करते. "एक दिवस असा येईल की त्या दिवशी मी गुलाम असायची थांबणार....मी मग वापरून फेकण्याची वस्तू असणार नाही. माझ्या इच्छेनं मी सर्व काही करीन पण माझ्यावर कुणीही सत्ता गाजवू शकणार नाही. तो दिवस नक्की येणार आहे. मग त्यासाठी कुठलीही किंमत मला मोजावी लागली तरी मी मोजेन."[४९] पारंपरिक गुलामगिरीचे जीणे झुगारून स्वतंत्र वाटचाल करू पाहणा-या शिक्षित संसारी स्त्रीचा आत्मनिर्धार अशारितीने तेंडुलकरांनी सरिताच्या रूपाने व्यक्त केला आहे.

तेंडुलकर सरिताच्या व्यक्तिचित्रणातून प्रगत आणि प्रस्थापित समाजातील स्त्रीचे स्थान आणि तिची बदलती मानसिक स्थिती यांचे प्रभावी दर्शन घडवितात. ते सरितासारख्या स्त्रियांची सनातन समस्या मांडत असतानाच, कमलाच्या रूपाने सामाजिक अन्याय सहन करणा-या उपेक्षित व अशिक्षित स्त्री मनाचे पदर उलघडवून दाखवितात. सरिता हे कौटुंबिक अन्यायाचे प्रतीक आहे. तर कमला हे सामाजिक अन्यायाचे प्रतीक आहे. एकूण कोंडी झालेली स्त्री आणि तिचे दुःख हा तेंडुलकरांच्या चिंतनाचा विषय आहे. स्त्रीला माणूस म्हणून बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन प्रस्तुत नाटकात प्रत्ययास येतो. या नाटकाच्या संदर्भात मुक्ता मनोहर म्हणतात, "आजच्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीत व्यक्तीची-माणसांची किंबहुना अर्थपूर्ण जीवन जगू इच्छिणा-यांची होणारी कोंडी, परिस्थितीतून निर्माण झालेली गुलामगिरी हा मुख्य विषय म्हणता येईल. कौटुंबिक आयुष्य आणि सामाजिक आयुष्य यातील व्दैत, दुभंगलेपणा नाटकातून चांगल्याप्रकारे पुढे येतो." ५०

तेंडुलकरांनी "**कमला**" नाटकाव्दारे, समाजातील उच्चमध्यमवर्गीय स्त्रीच्या एका विशिष्ट जाणीवेला जाणारा प्रवास चित्रीत केला आहे. स्त्रीच्या जाणीव-नेणीवेतील गुंतागुंत स्पष्ट करून, हा गुंता सोडविण्यासाठी आवश्यक असणारे आत्मबळ लाभलेली स्त्री त्यांनी सरिताच्या रूपाने उभी केली आहे. सरिताला निर्माण झालेल्या जाणीवा ह्या प्रातिनिधिक अनुभवाच्या प्रतिक्रिया म्हटल्या पाहिजेत, त्यातली पहिली जाणीव - आपण नव-याच्या गुलाम आहोत आणि दुसरी महत्वाची जाणीव - आपण एक दिवस गुलाम असायच्या थांबणार आहोत. याचा अर्थ परंपरागत मूल्यांना नकार देण्याचे, मालकी हक्कास आव्हान देण्याचे धैर्य आजच्या स्त्रीमध्ये येत आहे. ती स्त्री आजच्या नवमूल्यावर आधारित एक स्वतंत्र जीवन जगू पाहात आहे. हे नवमूल्य म्हणजे स्वातंत्र्य आणि समता. विसाव्या शतकात घडलेल्या मानवतावादी चळवळीमुळे स्त्रीला बळ मिळते. शिक्षणामुळे आत्मबळ मिळाले. हे तिच्या वळणाला, बदलण्याला कारणीभूत झाले. तिच्या व्यक्तिगत व सामाजिक गरजा व अपेक्षा बदलल्या. आपल्याकडून कुटुंबाच्या काय अपेक्षा आहेत तसेच कुटुंबाकडून आपण काय अपेक्षा बाळगायच्या, याचा सारासार विचार करून, यापुढे कशी वाटचाल करावी, याचा निर्णय घेण्याची शक्ती तिच्या ठायी निर्माण झाली. स्त्रीच्या बौध्दिक व मानसिक प्रगल्भतेला शिक्षण कारणीभूत झाले. कमलाकडे या शिक्षणाचा अभाव असल्याने ती स्वतःच्या गुलामगिरीचा विचार करू शकत नाही. सरिता शिक्षित असल्याने स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना दिसते.

शिक्षित स्त्रीचा जो लढा आहे तो समान हक्कासाठी-व्यक्तिमत्व विकासासाठी. पुरूषाशी स्पर्धा करून परंपरेशी उभे वैर मांडण्याची तिची वृत्ती नाही. विषमतेचा निषेध करून ती व्यक्तित्व विकासासाठी समतेचा आग्रह धरते आहे. ही समता तिला कुटुंबाकडून, समाजाकडून अपेक्षित आहे. त्यासाठी संघर्ष करावयाची, तिची मनाची तयारी आहे. अर्थार्जन करीत नसलेल्या स्त्रीला पुरूषसत्ताप्रधान कुटुंबपध्दती स्वीकारून, दबावाखाली राहावे लागते. काबाडकष्ट करूनही तिच्या पदरी उपेक्षा येते. समतेचे तत्व तेथे अव्हेरले गेलेले दिसते. पत्नी आणि माता या तिच्या स्वाभाविक भूमिका मानल्या जातात. त्यामुळे पतीची सेवा करणे, मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे म्हणजे स्त्रीत्व" अशा प्रचलित सांस्कृतिक कल्पनांच्या चौकटीतच तिला वागवले जाते. तिला पारंपरिक चौकटीत ठेवून तिच्याकडून सेवेची, त्यागाची, सोशिकतेची, प्रेमाची अपेक्षा बाळगली जाते. घर हेच तिने आपले विश्व मानावे, नव-याच्या कामात लुडबूड करून आपले वेगळे अस्तित्व दाखवू नये, अशी पुरूषांना सोयीची भूमिका तिला घ्यायला भाग पाडले जाते. सदैव कुटुंबासाठी तनमन झटणारी, पतीच्या सुखात सुख, दुःखात दुःख मानणारी, स्वतःच्या व्यक्तित्वाचे रंग विसरून पतीमध्ये संपूर्ण विलीन झालेली स्त्री ही आदर्श स्त्री, अशी आदर्श स्त्रीत्वाची समाजमान्य कल्पना दिसते. आजची स्त्री या समाजमान्य आदर्शाला फाटा देवून नवा आदर्श उभा करू पाहते आहे, त्यामुळे ठराविक चाकोरीतून जाणारी कुटुंबव्यवस्था ढवळून निघाली आहे. कुटुंब व्यवस्थेचा नव्याने विचार करून, कुटुंबातील सर्व घटकांना आपल्या विकासासाठी कसा समन्वय साधता येईल हे पाहणे गरजेचे आहे. वीणा आलासे यांच्या मते, "परंपरागत वैवाहिक संबंध हा समतेवर आधारित नव्हता. मालकी हक्काच्या जाणीवेवर आधारित होता. तो आज त्या जाणीवेवर टिकू शकत नाही. समता हे विसाव्या शतकाने दिलेले नवीन मूल्य आहे. या मूल्यास केंद्रस्थानी ठेवून वैवाहिक नात्याचे अमूलाग्र परिवर्तन करणे आवश्यक आहे."[५१] असे परिवर्तन जाधवांच्या कुटुंबात न घडल्यामुळेच सरिताची समस्या उद्‌भवल्याचे दिसते. सरिताच्या गुलामगिरी विरूध्दच्या प्रतिक्रियेतून, तिच्या मनात सुरू झालेला परिवर्तनाच्या प्रक्रियेची स्पष्ट कल्पना येते. अर्थात या प्रक्रियेला गती व कृतीची जोड मिळणे आवश्यक आहे. अन्यथा ती एक रम्य कल्पनाच ठरण्याची शक्यता आहे. यासाठी पुरूषवर्गाकडून अपेक्षित प्रतिसादाची आवश्यकता आहे. कारण पुरूषीवर्चस्वामुळेच आजवर स्त्रीची कोंडी होत आली आहे.

सरिताची जी कोंडी होती ती जयसिंगच्या विशिष्ट वागण्यामुळेच! त्यांचे पत्नीशी

वागणे - पारंपरिक वळणाचे आहे· ते अगदी सहज आहे· आपल्या वागण्याने, आपण तिच्यावर गुलामगिरी लादत आहोत, अशी अपराधिपणाची यत्‌किंचितही भावना त्याच्या मनात निर्माण होत नाही· आपल्यामुळे सरिताची कोंडी झाली आहे, तिच्या वाटयाला गुलामगिरी आली आहे, ही जाणीव त्याला होणे गरजेचे आहे· त्यातून ही कोंडी फुटण्याची शक्यता आहे· त्यासाठी सरिताने पुढे होवून ही जाणीव करून देवून, त्याला आपल्या वागण्या-बोलण्याचा अंतर्मुख होवून विचार करण्यास भाग पाडायला पाहिजे होते· परंतु तसे सरिताने काहीच न केल्यामुळे तिची घुसमट, कोंडी त्याच्यापर्यंत पोहचू शकत नाही· आता दुस-या बाजूने, तिनेही स्पष्ट जाणीव करून दिली असतीतर त्याने आपले वागणे बदलले असते का? जयसिंगचा अहंकारी स्वभाव पाहता, ते अशक्य वाटते· कारण एका वेगळ्या प्रसंगाच्या निमित्ताने ती काकासाहेबांना म्हणते, "ते थोडेच तुमच्या सांगण्याने बदलणार आहेत"[५२] म्हणजे अनुभवाअंती तिची अशी खात्री झाली आहे की, आपण आपल्या अपेक्षा त्याला सांगितल्या तरी त्याचा फारसा प्रतिसाद मिळणार नाही, उपयोग होणार नाही· ती एका ठिकाणी वैतागून फलटणला जायचे म्हणते· तिचे फलटणला जाणे म्हणजे जयसिंगच्या वागण्याच्या विशिष्ट पध्दतीला, त्याच्या मनमानी वागण्याच्या प्रवृत्तीला विरोध आहे· तिचा वैताग, वा त्या वैतागामागचा विचार समजावून घेण्यापेक्षा जयसिंग तिने फलटणला जायचे पसंत करतो व त्याप्रमाणे लगेच विमानाचे तिकीट काढायला निघतो· याचा अर्थच सरिताने प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेता आलेतर रहावे असा होतो· या प्रसंगाच्या निमित्ताने आपले वैतागणे कसे निरर्थक आहे याची खात्री तिला पटलेली आहे· अर्थात तिच्या ह्या वैतागण्यात समानतेच्या विचारापेक्षा सुरक्षिततेचा भाग असतो· तरीसुध्दा, जो उभयतांच्या विशेषतः स्वतःच्या सुरक्षित भवितव्याच्या गांभीर्याने विचार करीत नाही, तो दोघांच्या बाबतीत, समानतेचा विचार कितपत स्वीकारू शकेल याची शंका येते· कमलाच्या बाबतीत या "घरात मी निर्णय घेणार," ही त्याची अधिकारी वृत्ती पाहता, वरील विधानाला बळकटी येते· जयसिंगचा आक्रमक स्वभाव पाहता, सरिता आपला स्वातंत्र्याचा निर्धार त्याच्या समक्ष व्यक्त करण्याचे धाडस करीत नाही· आपले दबलेले मन ती काकासाहेबांच्या जवळ मोकळे करते· एका दृष्टीने सरिताही परिस्थितीशरण स्त्री वाटते· "बाईनं काही म्हणून नाही एकदा तरी मालक बनायचं?"[५३] असा प्रश्न विचारणारी, माझ्या इच्छेनं सर्व काही करीन, पण माझ्यावर कुणीही सत्ता गाजवू शकणार नाही, असे आवेगाने म्हणून बंडखोरी करू पाहणारी सरिता नाटकाच्या अखेरीला - शुध्द हरपलेल्या जयसिंगच्या पायातले बूट काढून, सोफाशी जमिनीवर बसते· म्हणजे मनात असूनही

तिला पतीला सोडवत नाही असे दिसते. मथुरा कोरान्ने म्हणतात, "सरिताला कमलाच्या घरात येण्यामुळे कुटुंबातील आपल्या स्थानाची जाणीव होते. आपल्या घरात आपले स्थान गुलामापेक्षा वेगळे नाही हे वास्तव सरिताच्या लक्षात येते. त्यामुळे सरिताला आपल्या समस्येचे भान येते. सरिता घर, नवरा सोडून जावून स्वतंत्र राहायच्या विचारात असते. परंतु सरिताची बंडखोरी अंतर्गतच राहते."[५४] सरिता आपला निर्धार मनाच्या कप्प्यात बंद करते. ती आपला निर्णय कितपत अंमलात आणेल अशी शंका सरिताच्या शेवटच्या कृतीमुळे येते. गुलामगिरीतून सुटण्याचा कोणताच मार्ग नसल्याने सरिताचे जयसिंगच्या पायाशी बसणे मुक्ता मनोहरांना आक्षेपार्ह वाटत नाही.[५५] त्यांना सरिता ही परंपरेच्या गुलामगिरीत अडकलेली स्त्री वाटते. "एक दिवस मी गुलाम असायची थांबणार.." हा संवादही भोंगळ असल्याचे त्या स्पष्ट करतात.[५६] "दुसरा गुलाम फुकटचा मिळाला आहे. गुलामाच्या बापानं मोठी रक्कम मोजलेली"[५७] असे सरिता म्हणते. येथेही मनोहरांना तेंडुलकरांचा गोंधळ झाल्याचे वाटते. त्यांच्या मते, "हुंडा देवून मुलीचे लग्न लावणा-या बापाला ते गुलामांचा मालक म्हणत नाहीत. तेथे बाप म्हणतात. त्यामुळे मुलगी,"मुलगी" म्हणून वाढविण्यातला महत्वाचा भाग गळून पडतो. व स्त्री गुलामीचे नाते उरते ते फक्त नव-याची बायको असण्याशी. म्हणूनच ज्या एका परंपरेतून कमला आणि सरिता बांधल्या गेल्या आहेत, त्या गुलामीची खरी जाण सरितामध्ये विकसित होत नाही. अखेरीस फसवे शब्द वापरून ही जाणीव एका स्वप्नात अथवा सदिच्छेत सरिताला रूपांतरीत करावी लागते."[५८]

सरिताने समस्त स्त्री जातीचा, मूळ परंपरेचा विचार करावा, असे जे मनोहरांना वाटते, ते प्रस्तुत नाटकातील समस्या पाहता संयुक्तिक वाटत नाही. सरिता ही उच्चमध्यम-वर्गीय संसारी स्त्री आहे. ती आपल्या गुलामगिरीचा विचार, आपले अनुभव डोळ्यासमोर ठेवून करते. उच्च व मध्यमवर्गीय स्त्रियांच्या समस्या व कनिष्ठ सामाजिक गटातील, अशिक्षित, मागासवर्गीय स्त्री च्या समस्या यांचे स्वरूप वेगळे आहे."[५९] हे डॉ.परुळेकर यांचे मत येथे विचारात घेतले पाहिजे. कमलाचा विचार सरिता माणूसकीच्या नात्याने करते. तर स्वतःचा विचार "माणूस" म्हणून करते. तिने खोलवर जावून स्त्री गुलामगिरी परंपरेचा विचार करावा, अशी व्यापक भूमिकेची तिच्याकडून अपेक्षा करणे अप्रस्तुत आहे. तिचा अनुभव मर्यादित आहे. तो प्रामुख्याने कौटुंबिक गुलामगिरीशी निगडीत आहे. त्या गुलामगिरीतून बाहेर पडण्याचा निर्धार ती व्यक्त करते. सरिता ही उच्चमध्यमवर्गीय

संसारी स्त्रियांची प्रतिनिधी आहे हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे तिच्या बाबतीत जाणवणा-या मर्यादा, येथे स्पष्ट दिसतात. आजची संसारी स्त्री सहजासहजी गुलामगिरीतून मुक्त होवू शकणार नाही हे सरिताच्या "पायातले बूट काढणे" या अखेरच्या कृतीतून तेंडुलकरांनी सुचित केले आहे. तेंडुलकर म्हणतात, "अजूनही स्त्रियांचे मन हे पारंपरिकच आहे. त्यांच्या रक्तातील पारंपरिक हिंदू स्त्री जात नाही"[६०] याचमुळे जयसिंग संकटात सापडलेला पाहताच सरिता आपला निर्धार मनात कायम ठेवून त्याला सावरण्याचा प्रयत्न करते. त्याच्याबद्दल तिला सहानुभूती वाटते. "बाहेरच्या दुष्ट जगाने अन्याय केल्यावर जणू निष्पाप अशा जयसिंगला ती सावरू पाहते. त्याच्या पायातले बूट काढते. ती जणू जयसिंगवर "प्रेमाचा वर्षाव करणारी क्षमाशील माता"[६१] झालेली असते. "गाढ झोपेत सगळेच मालक किती निष्पाप वाटतात नाही? त्यांना इथंच असू दे, मी आहे ना जवळ"[६२] या तिच्या प्रश्नार्थी उद्गारातून जयसिंगच्या जागेपणाच्या वागण्यातली अन्यायी वृत्ती सुचित होते. तसेच "मी आहे ना जवळ"[६३] या उद्गारातून तिच्या स्त्री सुलभ वात्सल्यवृत्तीचा प्रत्यय येतो.

जयसिंग व सरिता यांच्यात होणा-या संघर्षातून उचंबळणा-या क्षुब्ध भावना, फुलणारे धगधगीत विचार व परत उन्मळून येणा-या भावना, याप्रमाणे नाटक साकार होते. नाटकाच्या शेवटी पुरुषार्थाच्या अहंकारात वावरणा-या जयसिंगची गोची होते. त्याचा मालक त्याला नोकरीवरून काढून टाकतो. हा धक्का सहन न झाल्याने जयसिंग कोलमडून पडतो. सरिता आपला विद्रोह मनाच्या कप्प्यात बंद करून त्याला आधार देण्यासाठी पुढे होते. हा शेवट डॉ. वर्वे यांना काहीसा कोमट व मचूळ वाटतो. हा शेवट स्त्री स्वातंत्र्याला बगल देणारा मानावयाचा की स्त्री सुलभ वत्सल भावनेच्या स्वाभाविक अविष्कार समजावयचा? असा प्रश्न ते उपस्थित करतात. अर्थात या प्रश्नाच्या उत्तरावरच हा शेवट कोमट किंवा मचूळ असे अवलंबून असल्याचे ते स्पष्ट करतात.[६४] सरिताची बंडखोरी अंतर्गत राहिल्याने व "पायातील बूट काढण्याच्या" कृतीने काही प्रश्न उपस्थित होतात. परंतु नाटकाच्या शेवटी तेंडुलकरांनी जी कंससूचना दिली आहे- "नजर दूरवर भविष्यात.. स्थिरावलेली-मुद्रेवर निर्धार"[६५] ती फार मार्मिक आहे. यातून तिची भविष्यातील वाटचाल सूचित होते. तेंडुलकर भविष्याबद्दल नेहमीच आशावादी असतात. ते म्हणतात, "मला उद्याबद्दल उत्सुकता वाटते. उद्याची सकाळ माझ्यासाठी काही-तरी नवं घेवून येईल असं वाटतं."[६६] त्यादृष्टीने त्यांनी सरिताची नजर दूरवर भविष्यात

//

स्थिरावून तिच्या मुद्रेवर निर्धार सुचित केला आहे.

सरिताची बंडखोरी अंतर्गत राहत असलीतरी, सरितासारख्या स्त्रियांच्या सनातन समस्येला हे नाटक जावून भिडते. अजूनही स्त्रियांचे मन पारंपरिक असल्यामुळे त्या आपला निर्धार कृतीत आणू शकत नाहीत. "कमला" नाटकातील सरिताची भूमिका करणा-या लालन सारंग यांना आपणही सरितापेक्षा वेगळे नसल्याचे वाटते. प्रारंभी त्यांना सरिताची भूमिका इतर भूमिकासारखीच वाटली. परंतु जसजसे प्रयोग व्हायला लागले तसे त्यांना सरिताचे मन समजायला लागले. लहानपणापासूनच्या संस्कारातून स्वतःची सुटका करणं नेहमीच जमेना, असे त्या म्हणतात, पण सरितामुळे त्यांना ती जाणीव झाली. त्यांच्या मते, "आपलं मनं स्वतंत्र नाही हेच खरं. बहुतेक भारतीय स्त्रियांची अवस्था तेंडुलकरांनी "कमला" मध्ये शेवटी म्हटल्यासारखी आहे. नजर दूरवर भविष्यात स्थिरावलेली, मुद्रेवर निर्धार आणि मला वाटतं हे ही नसे थोडके."[६७]

पारंपरिक भूमिकेला नकार देवून, स्वतःच्या इच्छेप्रमाणे स्वतंत्र वाटचाल करू पाहणारी सरिता अखेरीस जयसिंगच्या पायाशी बसलेली दाखविली आहे, याचा अर्थ ती निर्धारित विचारापासून बाजूला जाते आहे, असा नव्हे. त्यापूर्वी ती जे उद्गार काढते ते विचारात घेण्यासारखे आहेत, "तूर्त मी ते सगळं मनाच्या एका कप्प्यात बंद करून विसरणार आहे. एक दिवस असा येईल की त्यादिवशी मी गुलाम असायची थांबणार."[६८] याचा अर्थ, जयसिंगवर आलेले संकट विचारात घेवूनच ती आपला संकल्प पुढे ढकलते. "तूर्त विसरणार आहे" म्हणजे वेळ आली की मनाच्या कप्प्यात बंद करून ठेवलेले विचार कृतीत आणणार आहे, असाही त्यातून अर्थबोध होतो. नाटकाचा पडदा पडण्यापूर्वी तेंडुलकरांनी कंस सूचनेत निर्देशलेली सरिताची भावमुद्रा फारच बोलकी आहे.

सरिताच्या समस्या चित्रणातून तेंडुलकरांच्या आधुनिक दृष्टीचा व प्रगत विचारसरणीचा प्रत्यय येतो. सरिता "आपण गुलाम असायच्या थांबणार" म्हणते. म्हणजे कोणत्या प्रकारे वाटचाल करणार याचे उत्तर देत नाही. तसे तिने ते देणेही अपेक्षित नाही. तिच्या समस्येपर्यंत वाचक/प्रेक्षकांना भिडविणे महत्वाचे. त्या दृष्टीने विचार करता, हे नाटक थेटपणे सरिताच्या समस्येला भिडते. तेंडुलकरांचा स्त्री समस्येकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोन हा लक्षात येतो . "जीवनातील ब-याचशा समस्यावर निश्चित एकच एक असे उत्तर नसते याचे भान चांगल्या लेखकापाशी असते. जीवन व्यवहाराची अनिश्चितता,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यामिश्रता, संकुलता त्याला जाणवलेली असते· पण याचवेळी विश्लेषण वृत्ती व चिंतनशीलता यामुळे जीवनातील सोडवणूकीची काही एक भूमिका त्याच्या मनात निर्माण झालेली असते· चांगल्या लेखनात प्रश्नांची तयार उत्तरे सापडत नाहीत, पण लेखकाचे कल सहज अजमावता येतात·[६९] हे डॉ·सोमण यांचे मत या संदर्भात समर्पक वाटते·

"कमला" या नाटकातून कमलाची समस्या चित्रीत होत नाही· "कमला" ही सरिताच्या समस्या उद्‌घाटनाचे निमित्त आहे· नाटकाचे शीर्षक "कमला" असले तरी नाटक सरिताच्या समस्येभोवती गुंफले आहे· गुलामगिरीत वावरणा-या सरिता आणि कमला यांच्यामध्ये तफावत आहे· कमला आपल्या गुलामगिरीबद्दल अज्ञानी आहे तर सरिताला आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली आहे· परंतु तुर्त दोघींनाही वेगवेगळ्या अंगाने गुलामगिरी स्वीकारूनच जीवन जगावे लागते आहे· दोघींच्यात तुलना करता, एक प्रश्न मात्र उभा राहतो की, सरिता आज नाही उद्या तरी आपल्या गुलामगिरीतून मुक्त होवू शकेल···तसा विचार ती बोलून दाखवते· पण कमलाचे काय? ती एका वेगळ्या परिस्थितीत वाढलेली खेडूत स्त्री आहे· स्त्री म्हणून आपण संसार करावा, आपल्या मालकाची सेवा करावी, ही तिची भूक आहे· संसाराच्या रूपाने ती एका सुरक्षित व सुखमय आयुष्याची आकांक्षा धरते व त्या दिशेने विचार करते · सुखी संसाराचे स्वप्न रंगविते· या संदर्भात डॉ·विद्युत भागवत म्हणतात, "एकीकडे दडपलेल्या जातीतील स्त्रियांना लग्न हा प्रतिष्ठेने जगण्याचा मार्ग वाटतो तर उच्चशिक्षित स्वतंत्रवृत्तीच्या मुलींना लग्न हा व्यवहारातच गुलामगिरी वाटते·"[७०]

शिक्षणाच्या अभावी जाणीवा विकसित न झाल्यामुळे कमला संकुचित जगात समाधान मिळविण्याचा विचार व्यक्त करते· एकतर ती सामाजिकदृष्टया मागासलेली स्त्री आहे· एक गुलाम म्हणून विक्री करण्यासाठी तिला बाजारात आणली आहे· जो तिला विकत घेणार तो तिचा मालक होणार· दासी म्हणून राबविणार· "पूर्वी दक्षिण भारतातील काही जमातीमध्ये अशीच निघृण पध्दत होती· दारिद्र्यापायी नडलेल्या स्त्रिया जमीनदाराकडे दासी म्हणून जात· तिचा "वापर" हवा तसा तो करे·"[७१] आजही आपल्या देशात कमलासारख्या स्त्रियांची विक्री होते· वाटयाला आलेले भोग त्या निमूटपणे भोगतात, ही वस्तुस्थिती नाटकात स्पष्ट केली आहे· आजवर कमला हालअपेष्टात वाढली आहे· त्यामुळे जयसिंगचे घर तिला "राजाजी का महेल" वाटतो·[७२] आपल्या जीवनात ती स्वतःच्या अस्तित्वाबद्दल, भवितव्याबद्दल आणि आपल्यावर होणा-या अन्यायाबद्दल अनभिज्ञ आहे·

एक प्रकारचे अंधारमय जीवन ती जगत आली आहे. खरेदीच्या रूपाने तिच्यावर प्रकाश टाकला जातो. परंतु आपला खरेदी मागचा जयसिंगचा मूळ हेतू तिच्या आकलनापलिकडचा आहे. आपण उराशी बाळगलेले स्वप्न क्षणभंगूर आहे याची तिला जाणीवही नाही. तिचे आणि सरिताचे जग खूप वेगळे आहे. ती आपल्या दृष्टीने, सरिताकडे पाहते. सरिताही तिच्या सूरात सूर मिसळते, तिचा स्वप्नभंग करीत नाही. तिच्या वाटयाला येणारा अपेक्षाभंग अटळ असल्याचे पूर्णपणे माहित असूनही सरिता तिला दुखवत नाही. याठिकाणी सरिताच्या सहानुभूतीशील वृत्तीचा प्रत्यय येतो. याउलट कमलाकडे माणूस म्हणून पाहण्याचा जयसिंगचा दृष्टिकोन कोठेच दिसत नाही. सनसनाटी पत्रकारितेच्या प्रेमापोटीच जयसिंग कमलाचा प्रश्न हाताळतो आहे. तिच्या भाव-भावनांचा विचार तो करीत नाही. "आपण उगाचं फार सेण्टिमेण्टली पाहतो. तशी ही रानातली माणसं चांगली रोबस्ट असतात." [७३] ही त्याची कमलाकडे पाहण्याची दृष्टी आहे. एकंदर, कमलाला पत्रकार परिषदेपुढे पेश करून, आपण एका अनोख्या घटनेचा कसा धडाडीने शोध घेतला, हे सिध्द करण्यात यशस्वी होणे व त्यातून नावलौकिक मिळविणे हाच पत्रकार जयसिंगचा उद्देश स्पष्ट दिसतो. सामाजिक अन्यायाकडे पाहण्याचा वृत्तपत्रांचा दृष्टिकोन कसा व्यावसायिक होत चालला आहे. याकडे तेंडुलकर लक्ष वेधतात. प्रस्तुत नाटकातील चित्रणाचा "आजच्या काळात वृत्तपत्रांची भूमिका व पत्रकारांचे कार्य" या संदर्भाने विचार करुया.

## ××× "कमला" नाटकातील चित्रणाचा वृत्तपत्रीय अंगाने विचार ×××

तेंडुलकरांनी "कमला" नाटकात, जयसिंग आणि काकासाहेब या दोन पिढीतील पत्रकारांच्या व्यक्तिचित्रणातून, पत्रकारितेकडे पाहण्याचे दोन भिन्न दृष्टिकोन स्पष्ट केले आहेत. एकूण नाटकाचा विचार करता, व्यावसायिक पत्रकारिता आणि स्त्री गुलामगिरी असे दोन पातळीवरचे चित्रण आणि त्यातील संघर्ष नाटकात आढळतो. प्रस्तुत नाटक पारंपरिक स्त्री समस्येला प्राधान्य देणारे असलेतरी, त्या अनुषंगाने चित्रणात जाणवणारा पत्रकारितेचा प्रभाव दुर्लक्षित करता येण्यासारखा नाही. एकतर तेंडुलकर चरितार्थासाठी प्रारंभीच्या काळात वृत्तपत्र व्यवसायामध्ये वावरले आहेत. त्यामुळे वृत्तपत्र व्यवसायासंबंधी त्यांची असणारी भूमिका, त्या संदर्भातील त्यांची मते आणि अपेक्षा समजावून घेणे आवश्यक

आहे. "आजच्या काळात वृत्तपत्रांची भूमिका, पत्रकारांचे स्थान याची चर्चा होत राहते, तुम्ही दीर्घकाळ पत्रसृष्टीशी संबंधीत, एक तटस्थ व्यक्ती म्हणून या व्यवहाराकडे तुम्ही कसं बघता?"[७४] या प्रश्नाला उत्तर देताना ते मुलाखतीत आपले विचार व्यक्त करतात. त्यांना वृत्तपत्र ही एक प्रकारची सत्ता वाटते. त्यामध्ये संयमाची आवश्यकता आहे. ही सवय नसेल तर सत्ता चढू शकते. आपण मूल्य, तत्व वगैरे शब्द वापरतो पण त्यापेक्षा सत्ता चढू न दिलीतर अनेक गोष्टी टाळणे शक्य आहे, असा त्यांना विश्वास वाटतो. शोधपत्रकारितेच्या नावावर आज अनेक गोष्टी चालतात. दोनचार तास वा एकदोन दिवस एखाद्या ठिकाणाला भेट देवून मला सत्यं कळलं असं म्हणणं आणि त्यावर मी अंतिम निकाल देण्याच्या भावनेनं लिहणं, हा त्यांना गुन्हा वाटतो. वृत्तपत्राने दोन्ही बाजू समजावून घेवून दिल्या पाहिजेत. आपली मत हवीतर अग्रलेखात मांडली पाहिजेत. वृत्तान्त हा एकांगी, विकृत व भडक न देता, पत्रकाराने सामाजिक जबाबदारीने लिहिले पाहिजे. जबाबदारीने लिहिणारे लोक आहेत पण ते अपवादात्मक. पत्रकारितेच्या प्रशिक्षणातच यावर जोर दिला पाहिजे." अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

वृत्तपत्र हे जनजागृती करणारे प्रभावी प्रचार माध्यम आहे. या माध्यमाने सामाजिक परिस्थिती व त्यातील समस्या मांडल्या पाहिजेत. त्याबरोबरच त्या समस्यांच्या निराकरणाचा संभाव्य मार्ग, आवश्यक ते उपाय सुचविले पाहिजेत. सामाजिक न्याय, समता, व्यक्तिस्वातंत्र्याला पोषक असे वातावरण निर्माण करून, लोकांच्यात सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लावली पाहिजे. समाजमनाला थेट भिडण्याचे व मानवतावादी विचार रुजविण्याचे सामर्थ्य वृत्तपत्रांकडे असते. अतिरंजित वृत्तान्त देवून लोकभावना भडकविण्यापेक्षा, लोकमनाची कदर करून उच्च मूल्ये जोपासली पाहिजेत व समाजप्रवाहाला सुयोग्य दिशा दिली पाहिजे सामाजिक, राजकीय अन्याय उघड करून, सामाजिक न्याय, समता प्रस्थापित करण्यासाठी व प्रगत विचार देवून, सामाजिक परिवर्तन करण्यासाठी वृत्तपत्रे महत्वाची कामगिरी पार पाडू शकतात.

मराठी भाषेतील आद्य वर्तमानपत्र "दर्पण" आपल्या पहिल्या अंकात आपली भूमिका स्पष्ट करते-"मनोरंजन करणं, चालते काळाची वर्तमान कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टीची दर्पण छापणा-यास मोठी उत्कंठा आहे."[७५] वृत्तपत्रांचे कार्य विशद् करताना न.र. फाटक म्हणतात, " लोकांना परिस्थितीचे ज्ञान देवून विशिष्ट प्रगतिकारक मतांचा प्रसार करण्यासाठी वृत्तपत्रांचा अवतार होता."[७६]

वरील विवेचनाच्या आधारे आपणास कमला नाटकातील पत्रकारितेचा विचार करावयाचा आहे. या नाटकातील काकासाहेब हे जुन्या पिढीतील पत्रकारितेचे प्रतिनिधित्व करतात तर जयसिंग नव्या पत्रकारितेचे प्रतिनिधित्व करतो. "चालते काळाची वर्तमान कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे वा लोकांना परिस्थितीचे ज्ञान देवून विशिष्ट प्रगतिकारक मतांचा प्रसार करणे" या भूमिकेशी काकासाहेबांची विचारसरणी जुळणारी आहे. घटनेच्या तपशीलापेक्षा विचार सांगणे, सामाजिक अन्याय, अत्याचार थांबवता कसा येईल याचा रस्ता दाखविणे हे त्यांना पत्रकारितेच्या दृष्टीने महत्वाचे वाटते. तर जयसिंगला सामाजिक अन्यायकारक घटनेचा सविस्तर वृत्तान्त देवून खळबळ माजविणे महत्वाचे वाटते. कमलासारख्या अनेक स्त्रियांची विक्री जेथे होते तो लुहारडागा येथील माणसांचा बाजार धाडसाने शोधण्याचे व दाखविण्याचे काम तो करतो. आजच्या घटकेला आपल्या देशात असा बाजार चालतो हे पुराव्यानिशी सिध्द करण्याची त्याची मोठी धडपड दिसते. परंतु कमलासारख्या स्त्रियांवर होणारा सामाजिक अन्याय थांबविण्यासाठी काय करता येईल याचा मार्ग वा उपाय तो सुचविताना दिसत नाही. कमलाच्या भाव-भावनांची कदर न करता तिचा पत्रकारितेसाठी वापर करण्यावरच त्याचा अधिक जोर दिसतो. कमलाला अनाथाश्रमात दाखल करण्याचा निर्णय त्याने सहानुभूतीपोटी नव्हेतर, स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतला आहे. कारण स्त्रियांची विक्री करणे हा जसा गुन्हा आहे, तसाच स्त्रियांची खरेदी करणे हाही गुन्हा आहे. त्याबद्दल शिक्षा होवू शकते. त्यासाठी कमला पोलिसांच्या हाती न लागेल. हे पाहणे त्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. म्हणून तो कायद्याने आपली बाजू व्यवस्थित केल्याचे सरिताला सांगून कमलाला अनाथाश्रमात ठेवण्याचे समर्थन करतो. आदिवासी स्त्रिया तुरुंगात कशा आनंदाने राहायचे पसंत करतात, हे त्याने घेतलेल्या त्यांच्या मुलाखतीच्या आधारे पटवून देतो. सरिताने कमलाचा हळवेपणाने विचार करणे त्याला पसंत नाही. "प्रेस कॉन्फरन्स झाली की इथलं कमलाचं काम संपलं" असेही तो म्हणतो.[७७] एकूण प्रेस कॉन्फरन्स ही त्याच्या दृष्टीने महत्वाची बाब असते. या घटनेला जबाबदार असणाऱ्यांची पापं उघड करण्यात व खळबळ माजविण्यातच त्यास धन्यता वाटते. "मुद्देमालासकट हे पापं ज्याच्या त्याच्या गळ्यात घालणं ही जबाबदारी मग आलीच. दुसरे कोण हे करणार?"[७८] असे तो उत्साहाने म्हणतो व त्यासाठी त्याची धावपळ चाललेली दिसते.

काकासाहेब नव्या पत्रकारितेला "नवा धावपळ जर्नालिझम". म्हणतात. त्यांच्या मते आजचा पत्रकार, आग लागलेली असो, दंगल, बलात्कार वा मंत्रीमंडळ गडगडलेले

असो; तेथे प्रत्यक्ष हजर राहण्यास महत्व देतो· मग काहीही लिहा ना का···? तपासून पहायला वेळ कुणाला असतो· थांबला तो संपला· धावपळ जर्नालिझम ·पाहू बरे कोण पुढे पळे तो· मग वेळ पडल्यास काहीही ठोकून देतो· "विचार सांगण्याऐवजी रक्तबंबाळ वर्णन मिटक्या मारत करणारा हा कसला पत्रव्यवसाय· हा रक्तव्यवसाय![७९] अशा खरमरीत व परखड शब्दात काकासाहेब आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात· त्यांना नव्या पत्रकारितेचा बाजारी दृष्टिकोन पसंत नाही· म्हणूनच ते आजच्या पत्रकारितेवर आक्षेप घेवून घणाघाती प्रहार करताना दिसतात·

शोध पत्रकारितेच्या नावाखाली जयसिंगने स्त्रियांचा बाजार उघड केला· पुरावा म्हणून कमलाला दोनशे पन्नास रूपयात खरेदी केले· परंतु हे सारे भांडवली वृत्तपत्राला सनसनाटी बातमी पुरवून प्रसिध्दी मिळविण्याच्या उद्देशाने। त्या दृष्टीनेच तो कमलाच्या प्रश्नाला भिडतो··· स्त्रियांच्या विक्रीत त्याला रस नाहीतर पत्रकारितेत आहे - "बायकांची विक्री देशात तशी अनेक ठिकाणी होत असते· शहरोशहरीचे वेश्यांचे मोहल्ले त्याशिवाय चालतात की काय? प्रश्न तो नाही· आम्ही लुहारडागा कसं प्रोजेक्ट करतो त्याचा आहे, टेक्निकचा आहे· आर्ट लाइज इन प्रेझेंटिंग द केस नॉट इन द केस इटसेल्फ। आम्ही हे प्रकरणं कसं वाजवतो पहात रहा· देअर विलबी हाय ड्रामा इन टु डेज प्रेस कॉन्फरन्स· खळबळ माजणार आज·"[८०]

कमलासारख्या स्त्रियांची समस्या जाणून घेवून त्यांना सामाजिक न्याय देण्यापेक्षा, आपल्या पत्रकारितेसाठी तिचा वापर करून स्वतःचा नावलौकिक वाढविण्याच्या प्रयत्नात जयसिंग दिसतो· पत्रकार परिषदेपूर्वी आवश्यक असणारी गुप्तता पाळण्याच्या सुचनाही तो सरिताला देतो· काकासाहेब त्याला " रक्त व्यवसायातलं कट-कारस्थानं " म्हणतात·[८१] त्यांना आजची पत्रकारिता म्हणजे पैशासाठी, वैभवासाठी चाललेला खेळ वाटतो· जयसिंगच्या पेपरचे जुने अंक चाळत असताना, आपणास या पध्दतीने आपला पेपर चालवावा, असा विचार सुचल्याचे ते जयसिंगला सांगतात· तेंव्हा जयसिंग "तुमच्या साधन-शुचितेचं काय?"[८२] असे विचारतो· म्हणजे काकासाहेबांनी आजवर साधन-शुचिता जोपासली आहे व ती आजच्या पत्रकाराजवळ नाही, हेच जयसिंग कबूल करतो· जयसिंगसारखी दोन उचापती पोर ठेवून, धावपळ तंत्र, गुप्त हेर-गिरी वगैरे मार्गांनी रोज जिल्हयाच्या कोना-कोप-यातून नवनवा मालमसाला आणयचा, तो तिखटमीठ लावून छापायचा, रोज नवी खळबळ नवे स्फोट, फिर्यादी, धमक्या, खुलासे, प्रतिखुलासे, वाढता खप, वाढत्या जाहिराती, वाढतं

BARR. BA... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI ... Y KOLHAPUR

उत्पन्न, पुन्हा हाती नोटांची पुडकी घेवून दाराशी ताटकळणारे अडचणीतले मातबर. या मार्गाने बंगला व इस्टेट उभारण्याची कल्पना काकासाहेब जयसिंगला बोलून दाखवितात. एकंदर आजच्या वृत्तपत्र व्यावसायिकांची प्रवृत्तीच ते स्पष्ट करतात. यात धोका असला तरी प्राप्तीही तशीच आहे. याबाबतीत ते जयसिंगचेच उदाहरण त्याला देतात. "पाच वर्षापूर्वी करोल बागेत आऊट हाऊसमध्ये संसार थाटून जगणारा तू आज या नीतीबागेत छोटयाशा का असेना पण बंगल्याचा रहिवासी आहेस.[८३] नोकरचाकर, गाडी, विमानानं देशात कुठही फिरणं, पंचतारांकित हॉटेलात तळ टाकणे, परदेशी वकिलातीतून पार्टीची आमंत्रण येणं, थेट मंत्र्या-मुख्यमंत्र्यापर्यंत नाहीतर अगदी पंतप्रधानापर्यंत राबता असणं..काय वाईट आहे. हा खेळ जमेलं त्यानं खेळायला काही हरकत नाही, तसा वाघावर स्वार होण्याइतका तो कठीण आहे, सोपा नाही, असेही स्पष्टीकरण काकसाहेब करतात. आपली पत्रकारिता म्हणजे पोटार्थी जर्नालिझमचा नवा प्रकार आहे असे जे काकासाहेबांना वाटते, त्याबाबत जयसिंग विरोध दर्शवितो. आपल्या पत्रकारितेमागे "सोशल पर्पज" असल्याचे सांगून जयसिंग स्पष्ट करतो की, "देशातला टोटल मॉरल रॉटमध्ये कुणीतरी मॉरल प्रिन्सिपल्स, मॉरल नॉर्म्स, मॉरल व्हॅल्यूज, अपहोल्ड करायला हवेत. कुणीतरी ज्यांच्या हाती पॉवर मशिनरी आहे त्यांची बेबंद चाल रोखायला हवी. समाजातल्या वुईक बॅकवर्ड सेक्शनवर ॲटॅक्स होत आहेत, त्याविरूध्द बोंब मारणारं कुणी आज हवं आहे. आज देशातला कॉमन मॅन एका-एका गुंगीत जगल्यासारखा जगतो आहे. त्याला वारंवार धक्के मारून सत्य परिस्थितीची जाणीव देणं, त्याला कॉन्सिएण्टाइज करणं, त्याला एका सोशल आणि पोलिटिकलं चेंजच्या स्ट्रगलसाठी प्रिपेअर करणं यासाठी एका शक्तीची गरज आहे व हे काम आम्ही करत आहोत."[८४] जयसिंगची आपल्या भावना व्यक्त करण्याची भाषापध्दत पाहून काकासाहेब हरकत घेतात. बहुसंख्य लोकांना न समजणा-या इंग्रजी भाषा माध्यमावर आक्षेप घेतात, आपला विचार बहुसंख्य लोकापर्यंत पोहचवण्यासाठी व अपेक्षित सामाजिक, राजकीय बदलासाठी. "आधी लोकांच्या भाषेत बोला, लिहा, मग सांगा"[८५] असा काकासाहेब त्याला सल्ला देतात. आपण वाचकासाठी लिहितो आहोत याचे भान वृत्तपत्रलेखकाजवळ असणे आवश्यक आहे. या संदर्भात तेंडुलकरांनी स्वतःबद्दल केलेले भाष्य लक्षात घेण्यासारखे आहे. "वृत्तपत्र व्यवसायाने मला फार मोठी गोष्ट शिकविली. आणि ती म्हणजे वाचकासाठी लिहायचं"[८६] आपले "कोवळी उन्हं" हे सदर लोकप्रिय झाले असल्याचे नमूद करून, "लेखक म्हणून आणि माणूस म्हणून माझं क्षितीज रूंदावण्याला या सदराने मदत झाल्याचे ते म्हणतात.[८७]

नावलौकिक आणि वैभव कमविणे हा सध्याच्या पत्रकारितेचा प्रधान हेतू असल्याचे काकासाहेबांना वाटते. ते जयसिंगला म्हणतात, "हा तुमचा जर्नालिझम पैसा मिळविण्यासाठी नसेल ना, तर तो वंध्या संभोग आहे..."[८८] यातून काहीही निष्पन्न होणार नाही. लोकांना परिस्थितीचे ज्ञान देवून, विशिष्ट प्रगतिकारक मतांचा प्रसार करण्यात आजचे पत्रकार अपुरे पडतात. ही खंत काकासाहेबांच्या एकूण बोलण्यातून व्यक्त होते. त्याचे प्रत्यंतर कमलासंदर्भात आयोजित केलेल्या पत्रकारपरिषदेच्या निमित्तानेही येते. जयसिंगला आपण बाजी मारले असे वाटत असलेतरी पत्रकार परिषदेचे स्वरूप पाहाता त्यात कोठेही सामाजिक हेतू दिसत नाही, सामाजिक भान विसरून बेभान झालेल्या पत्रकार मंडळींचे असभ्य वर्तन नजरेस येते. पत्रकार जैन आपल्या मित्राचे कर्तृत्व काकासाहेबांना सांगताना म्हणतो,"काकासाब तुमच्या जावयानं आज जोरदार तमाशा दाखवला" त्यावर जयसिंग "नाटक म्हणं नाटक" असे सुचवितो. परंतु जैन, "प्रेस क्लबवरच्या नाटकांना तमाशा असं म्हणतात."[८९] असे सांगून वस्तुस्थितीच स्पष्ट करतो. एका उपेक्षित स्त्रीवरील अन्यायाची गांभीर्याने दखल घेण्यापेक्षा तिची टर-टिंगल उडविण्यातच पत्रकारांना रस दिसतो. कोणी तिला फोटोसाठी पदर चेह-यावरून बाजूला करण्याचा आग्रह धरतो, तर कोणी एक हात धरून पोज देण्याचा प्रयत्न करतो. "प्रेस कॉन्फिरन्स सोडून कमला पळून जाते की काय, अशी शंका जैनला येते."[९०] कमलाच्या समस्याबाबत तिला काही प्रश्न विचारण्यापेक्षा तुमच्या भागातले महत्वाचे प्रश्न कोणते?, असे विचारले जाते. मूळ समस्येला कोणीही हात घालत नाही. आदिवासी स्त्रियांची दुःख समजावून घेण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. एकजण तर स्त्री मनाची कदर न करता कमलाला विचारतो की, "तुमच्यात फ्री सेक्स असतो म्हणे, तर अनौरस संततीचं काय करता?" असा वेडावाकडा प्रश्न सहन करीत नाही तोच दुबे[९१] "इस नये सेठ के साथ थोडा बहुत फी सेक्स किया होगा तुमने-तो इसके बारे में कुछ तो हमें बताओ, कुल मिलकर अनुभव कैसा रहा?"[९२] असे निःसंकोचपणे विचारून हिडीस, असभ्य विनोदाचे दर्शन घडवितो. रोजच्या राजकारणाचा मामला नाही म्हटल्यावर त्या गरीब बाईची मजा करण्यातच पत्रकारांना विकृत आनंद वाटतो. कमलाच्या अज्ञानाचा गैरफायदा घेणा-या पत्रकारांना जयसिंग प्रतिकार करीत नाही. भावनिक पातळीवर कमलाचा विचार करीत नाही. "मला फक्त तिला एक एव्हिडन्स-पुरावा म्हणून प्रेझेन्ट करायचं होतं, ते झालं."[९३] असं म्हणून तो बाजूला होतो. सरिता मात्र कमलाकडे सहानुभूतीने पहात असते. जयसिंग मात्र कमलासारख्या व्यक्तींचा "रानातली

माणसं" असा उल्लेख करून आपण त्यांच्याकडे उगाचच फार सेण्टिमेण्टली पाहतो· असे म्हणतो·[९४] आदिवासी माणसं कशी कणखर असतात या संदर्भात तो, अस्वलानं हाड बाहेर काढलेले असताना मिशन हॉस्पिटलमध्ये स्वतःच्या पायानं चालत येणा-या आदिवासी लोकांची माहिती देतो· ही माणसं जात्याच सहनशील असतात म्हणून त्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहणे काकासाहेबांना पसंत पडत नाही, तर कमलाला पत्रकार परिषदमध्ये वेडवाकडे प्रश्न विचारले जात असताना, तिचं हसं होत असताना जयसिंग स्वस्थ बसून पाहात राहिल्याबद्दल, सरिता नाराजी व्यक्त करतो· जयसिंगच्या मते, कमलाचे हसं होत आहे, हे तिला कळतंही नव्हतं· तिला कळतं नव्हतं म्हणून हसं झाले ते बदलत नाही, असे काकासाहेब त्याला जाणवून देतात· आपल्या फायद्यासाठी जयसिंगने कमलाचा केलेला वापरही त्यांना रूचत नाही· "प्रेस कॉन्फरन्स मी माझ्या फायद्यासाठी घेतली नाही· माणसांच्या बाजाराचं महाभयानक सत्य उजेडात यावं म्हणून घेतली·"[९५] असे सांगून सरिता व काकासाहेबांचा गैरसमज दूर करण्याचा जयसिंग प्रयत्न करतो· परंतु जयसिंगने माणसांच्या बाजारात महाभयानकं सत्य उजेडात आणण्यासाठी "एका अडाणी आणि गरीब बाईचा बाजार केला·"[९६] हा काकासाहेबांचा निष्कर्ष जयसिंगला चांगलाच झोंबतो· एकदम आवाज चढवून तो काकासाहेबांना आपले विधानं मागे घ्या म्हणतो· काकासाहेबांच्या घणघाती टीकेमुळे जयसिंगला विलक्षण ताण येतो· जयसिंगच्या आक्रमक, अहंकारी व वृत्तीला ही टीका पेलवत नाही· काकासाहेबांचा एका तात्विक भूमिकेतून जयसिंगशी वाद होतो, त्यांची भूमिका समजावून न घेताच जयसिंग त्यांना क्षमा मागायला लावतो· जयसिंग-काकासाहेब यांच्या वादातून तेंडुलकर बदलत चाललेल्या पत्रकारितेचे स्वरूप व प्रवृत्ती उलगडून दाखवितात· सामाजिक समस्यचे भांडवल करून आपले पत्रकारितेतील कर्तृत्व सिध्द करणा-या, सामाजिक अन्यायाबाबत तात्विक भूमिका नसणा-या, प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून यश, कीर्ती, पैसा आपल्याकडे खेचणा-या नव्या पत्रकारितेचे दर्शन ते घडवितात·

जयसिंग सामाजिक बांधिलकीच्या भावनेने स्त्री विक्रीचा प्रश्न मांडत असलातरी तो आपल्या कामापासून अलिप्त राहतो· "कमला"मध्ये गुंतून राहणे त्याला पसंत नाही· तिच्या सुखदुःखाशी आपले कोणतेही घेणे देणे नाही, या भूमिकेतून तो केवळ पत्रकारितेसाठी, स्त्रियांचा बाजार उघड करण्याचे एक साधन म्हणून, कमलाकडे पाहतो· मुक्ता मनोहरांच्या मते, "एका जिवंत मनुष्यावर आपण प्रयोग करत आहोत· याचे थोडेही भान जयसिंगला नाही· याचे कारण बायांच्या विक्रीपेक्षा सनसनाटी पत्रकारिता करण्यात त्याला रस आहे.

आर्ट लाइज इन प्रेझेंटिंग द केस, नॉट इन द इटसेल्फ। ही त्याची धारणा आहे. त्यामुळे कमलाला माणूस म्हणून बघणे हे त्याच्या स्वभावात नाही. भांडवली वृत्तपत्राला सनसनाटी बातम्या पुरवणं हे त्याचं विश्व असतं."[97]

कमलाच्या असहाय्य व अडाणीपणाचा गैरफायदा घेवून, पत्रकार मंडळी तिच्यावर हल्ला करतात. या संदर्भात तेंडुलकरांनी एका मुलाखतीत वृत्तपत्राविषयी उभा केलेला प्रश्न महत्वपूर्ण आहे. "ज्यांच्याकडे उपद्रवशक्ती नाही, त्यांच्यावर हल्ले करता येतात. ज्यांच्याकडे उपद्रवशक्ती आहे त्याला हे लोक कधी ठोकतात?"[98] तेंडुलकरांच्या या प्रश्नाचे प्रत्यंतर प्रस्तुत नाटकात येते. कमलावर पत्रकारांनी केलेला हल्ला, तिच्याकडे उपद्रवशक्ती नसल्यामुळेच केलेला असतो. याउलट, पत्रकार परिषदेमध्ये, फ्लॅश मार्केटमध्ये गुंतलेल्या संबंधित माणसावर कोणीही हल्ला करीत नाही. फार मोठया पदावरची माणसं या फ्लॅश मार्केटच्या मागं आहेत असं कळल्याचे जैन नंतर सांगतो.[99] परंतु प्रत्यक्ष पत्रकार परिषदेमध्ये त्या माणसांचा शोध घ्यावा, त्यांच्यावर हल्ला करावा असे कोणालाही वाटत नाही. किंबहुना नाटकाच्या अखेरीस, त्या संबंधित माणसांचा मालकावर दबाव आल्याने त्याने जयसिंगला नोकरीवरून कमी केल्याचे जैन सांगतो. याचे कारण संपादक त्या माणसांची उपद्रवशक्ती व व्यावसायिक गरज ओळखून असतो. जैनच्या मते, जयसिंग भलत्याच लोकांच्या वाटयाला गेला. चुकीचे हितसंबंध त्याने दुखविले."[100] याचा अर्थ स्त्रियांच्या विक्रीपेक्षा, त्या विक्रीमागे गुंतलेल्या समाजविघातक माणसांचे संबंध जपणे मालकाला महत्वाचे वाटते. त्यासाठी जयसिंगसारख्या शोधक, भेदक पत्रकाराचा बळी गेला तरी त्याची पर्वा नाही.

लोकांचे दोष चव्हाटयावर आणून, लोकांना शिकवून शहाणे करणे, हे वृत्तपत्रांचे कर्तव्य असते. परंतु प्रस्तुत घटना पाहता, वृत्तपत्र आपले कर्तव्य चोखपणे पार पाडत नाही, असे दिसते. अशावेळी आगरकरांचा वृत्तपत्रीय बाणा विशेष स्मरणीय वाटतो. "जर अन्याय दिसेलतर बोलून दाखविणार. मग तसे करताना माझ्याजवळ आपपर भाव दिसावयाचानाही. योग्य ते बोलेन योग्य तेच लिहिनं" अशी बेडरवृत्ती आगरकरांची होती. अन्यायाची चीड हे त्यांच लेखनाचे सार होते.[101] "वृत्तपत्र हे सामर्थ्य असते व त्याचा उपयोग नेहमी चांगल्याच दिशेने केला जातो, असे म्हणता येणार नाही. हल्ली वृत्तपत्रे राजकीय पक्षांची तळी उचलण्याकरिता जन्माला येत असल्याने त्यांनी सत्याची गळेचेपीबद्दल गवगवा करणे हे उलटया हाकाटीचे लक्षण समजावयास पाहिजे. धनाढय व्यापारी वर्ग वृत्तपत्राकरांना त्यांच्या व्रतापासून ढळावयास लावतो" हे न.र.फाटक यांचे विचार[102]

सद्यस्थितीतही लागू पडतात.

जयसिंगला तडकाफडकी बडतर्फ करणा-या मालकाच्या निर्णयावर काकासाहेब विचारतात, "अपराध काय जयसिंगचा? अशी कोणती चूक त्यानं केली?" काकासाहेबांच्या प्रश्नांची नेमकी उत्तरे जैन देवू शकत नाही. तो जयसिंगच्या अन्यायाबाबत संघर्ष करायचा इरादा बोलून दाखवितो. सामाजिक अन्यायावर प्रखर टीका करण्यापेक्षा, अन्यायाला पाठीशी घालून गैरहितसंबंध जपणा-या वृत्तपत्रीय अनिष्ट प्रवृत्तीचे दर्शन तेंडुलकरांनी प्रस्तुत नाटकात प्रभावीपणे घडविले आहे.

पत्रकारितेसाठी का असेना, पण जयसिंग एक स्त्री विक्रीचे महाभयानक सत्य मांडत असतो. या घटनेला जबाबदार असणा-यांची कृष्णकृत्ये उजेडात आणण्यासाठी धडपडत असतो. या गोष्टीचे गांभीर्य लोकांना कळण्यासाठी शिक्षाही पत्करायला तयार असतो. आपला संपादक सुप्रीम कोर्टापर्यंत केस लढवणार असल्याचा विश्वास तो व्यक्त करतो. एकूण या घटनेला न्याय देण्यासाठी संपादक आपल्या बाजूला ठामपणे उभा राहील याची त्याला खात्री असते. पण तसे काहीच घडत नाही. स्त्री समस्या मांडणा-या जयसिंगवरच अन्याय होतो. निर्भिडपणे पाप उघड करणा-या जयसिंगला साथ देण्यापेक्षा, संपादक भ्याडपणे त्यात गुंतलेल्या माणसांना सामील होतो. पाठीशी घालतो. एवढचं नव्हेतर त्यांचा दबाव आल्याने जयसिंगला नोकरीवरून कमी करतो. वृत्तपत्रांनी सामाजिक हितासाठी कोणाची गय करता कामा नये. परंतु सामाजिक अन्याय वेशीवर टांगून त्यात गुंतलेल्या माणसांचा ढोंगीपणा उघड करण्यापेक्षा-जयसिंगने शोधलेले प्रकरण मिटवून त्याला नोकरीवरून कमी करणे मालकाला अधिक फायदेशीर वाटते. मोठया पदावरच्या माणसांचा रोष घेण्याची त्याची तयारी नाही. कोणतीही पूर्वसूचना न देता जयसिंगला तडकाफडकी बडतर्फ करण्याचा निर्णय मालक घेतो याचे कारण काकासाहेब विचारतात. जयसिंगनेच त्याच्या मालकाच्या पेपरला प्रतिष्ठा मिळवून दिल्याचे ते सांगतात. परंतु "मोठया पेपरला प्रतिष्ठा वगैरे असत नाही, त्याला फक्त खप असतो आणि जाहिराती असतात. आणि एक नफा किंवा तोटा असतो" असे स्पष्टीकरण जैन करतो. सामाजिक मूल्यापेक्षा व्यावसायिक गोष्टींना महत्व देणारी, निःपक्षपातीपणा, निर्भिडपणा, निःस्पृहता, अन्यायाची चीड, सामाजिक अन्यायाविरूध्द, जनजागृती ही मूल्ये पायदळी तुडवून आर्थिक लाभासाठी गैरहितसंबंध जपणारी व त्यासाठी समाजकटंकांना पाठीशी घालणारी अनिष्ट प्रवृत्ती वृत्तपत्रीय व्यवसायाला घातक आहे. त्यामुळे स्त्री-विक्रीसारखी महाभयानक समस्याही

गौण ठरते· वृत्तपत्र मालकांच्या अनिष्ट प्रवृत्तीमुळे, स्त्री स्वातंत्र्याचा कैवार घेणा-या एका धाडसी व महत्वाकांक्षी पत्रकाराचीही अखेरीस शोकांतिका होते, हेच महाभयानक सत्य तेंडुलकरांनी प्रस्तुत नाटकाव्दारे स्पष्ट केले आहे·

### ××× "कमला" नाटकाचा वाङ्मयीन अंगाने विचार ×××

नाटक हा मूलतः एक वाङ्मयीन प्रकार असल्याने प्रस्तुत **"कमला"** नाटकाचा वाङ्मयीन अंगाने विचार करणे आवश्यक आहे· नाटक हे प्रयोगरूपाने पूर्णावस्थेस येते· ही वस्तुस्थिती असलीतरी ते प्रारंभी शब्दरूपाने जन्मास येते· "नाटक" ही अभिनयगर्भ शब्दांची साहित्यकृती असते· नाट्यसंहिता आणि तिचा प्रयोगालंकार यात अभिन्नताच असते, असावी लागते· नाटकाचा खरा प्रयोग त्या नाटकाच्या पुस्तकात बीजरूपाने असतो· पण त्यापेक्षा नाटकाच्या पुस्तकात नाट्यवृक्षच पानापानावर शब्दाशब्दातून आकारित झालेला असतो· असे म्हणणे अधिक योग्य ठरेल"[१०३] असे व·दि·कुलकर्णी नमूद करतात·

नाटकाची साहित्यिक समीक्षा करताना, नाट्याशयाच्या नवतेची चिकित्सा करून आशय आणि अभिव्यक्ती यातील संगती-विसंगती पाहणे, पात्रा-पात्रांचे भावसंबंध पारखणे, संवादशैलीच्या विविध रूपांचा अभ्यास करणे गरजेचे असते· तेंडुलकरांनी **"कमला"** नाटकामध्ये उच्चमध्यमवर्गीय स्त्रीची समस्या अभिनव पध्दतीने चित्रीत केली आहे· एका चित्तथरारक घटनेचे- स्त्रियांची विक्री-बीज घेवून त्यांनी स्त्री समस्येचे वास्तववादी दर्शन घडविले आहे· वास्तव बीजाला त्यांनी दिलेला नाट्यरूप आकार परिणामकारक आहे· पारंपरिक वळणाच्या स्त्रीपासून ते नव स्त्रीच्या विशिष्ट जाणीवेला जाणारा प्रवास त्यांनी मनोवेधकपणे चित्रीत केला आहे· **१९७५** हे वर्ष **युनोस्कोने** महिला वर्ष म्हणून जाहीर केले· स्त्री स्वातंत्र्याच्या प्रश्नांना पुन्हा एकदा गती मिळाली· यासाठी रंगभूमीचा साधन म्हणून उपयोग करून स्त्री-मुक्ती, स्त्री-स्वातंत्र्याचा लढा अधिक तीव्र झाला·

स्त्री जीवनाच्या कक्षा रुंदावल्या असल्यातरी परंपरेने स्त्रिया जखडलेल्या राहिल्या· नवीन जीवनाला सामोरे जाताना त्या स्त्रीला जुनी जीवनमूल्ये कशी जखडून ठेवतात· याचे उत्कट चित्रण तेंडुलकर करतात· पदरी पडणारे बरे-वाईट अनुभव निमूटपणे स्वीकारून केवळ कुटुंबासाठी जगणारी पारंपरिक स्त्री त्यांनी सरिताच्या रूपाने नाटकाच्या प्रारंभी उभी केली आहे· शिक्षित स्त्रीची संसारात होणारी कुचंबना, तिच्या वाटयाला आलेली

गुलामगिरी आणि त्यानंतर तिला स्वतःच्या अस्तित्वाची झालेली जाणीव, स्वतंत्र वाटचाल करण्याचा तिचा निर्धार व अखेरीस पारंपरिक मूल्यांचा पगडा यांचेही चित्रण त्यांनी "सरिता" च्या माध्यमातून केले आहे.

पांढरपेशावर्गातील सुखदुःखे, अधिकतर दुःखेच हा तेंडुलकरांच्या नाट्य चित्रणाचा मुख्य विषय आहे. व्यक्ती विरूध्द परिस्थिती, व्यक्ती विरूध्द कुटुंब, या संघर्षात व्यक्तीच्या स्वाभाविक प्रवृत्तीची, आशा आकांक्षाची कशी वाताहात होते हे तेंडुलकर दाखवितात. साध्या साध्या दैनंदिन घटनातून ते मानवी मनातील व्यथेचे, गुंतागुंतीचे दर्शन घडवितात. एक समग्र व्यक्ती उभी करण्याचे कौशल्य त्यांच्या व्यक्तिचित्रणात प्रत्ययास येते. त्यादृष्टीने प्रस्तुत नाटकातील सरिता या व्यक्तिरेखेचा विचार आपणास करावयाचा आहे. तसेच पात्रापात्रांचे भावसंबध अभ्यासण्यासाठी इतर व्यक्तिरेखांचाही विचार करणे आवश्यक आहे.

## xxx स्त्री समस्या संदर्भात व्यक्तिचित्रणांचा विचार xxx

**सरिता ::::**

सरिता ही नाटकाची मध्यवर्ती व महत्वाची व्यक्तिरेखा आहे. ती एका धाडसी व महत्वाकांक्षी पत्रकार जयसिंग जाधव यांची पत्नी आहे. स्त्रियांच्या विक्रीचा पुरावा म्हणून जयसिंगने घरी आणलेल्या, कमलाच्या आगमनापर्यंत, सरिताची भूमिका, पारंपरिक स्त्रीची आहे. पतीसाठी झटणारी, प्राप्त परिस्थितीत जगणारी, स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न न करणारी सरिता, कमलाच्या आगमनानंतर बदलत जाते. तिच्या परिवर्तनशील प्रक्रियेला प्रारंभ होतो. तिच्या परिवर्तनशील विचारांची प्रेरणा "कमला" आहे. किंबहुना पारंपरिक वळणाच्या सरिताच्या परिवर्तन प्रक्रियेला प्रारंभ करण्यासाठीच तेंडुलकरांनी कमला पात्राचे आयोजन केले आहे. सरिताला तिच्या गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी "कमला" हे एक निमित्त होते.

सरिताचे गुलामगिरीतून आलेले दबलेपण तेंडुलकरांनी कौशल्याने सुचित केले आहे. जयसिंगला येणारे फोन व्यवस्थित नोंदवून ठेवण्याबाबत सरिताने काकासाहेबांकडे केलेला खुलासा, जयसिंगचे खाणे-पिणे, कपडे याबाबतीत तिने कमळाबाईंना दिलेल्या सूचना, या नाट्यारंभीच्या प्रसंग-संभाषणातून पारंपरिकवृत्तीच्या सरिताचे सहज दर्शन घडते. फोनबाबत तिने केलेल्या खुलाशातून तिचे दबलेपण जसे व्यक्त होते, तसेच तिच्यावर

असलेल्या पती वर्चस्वाची जाणीव होते· उच्चमध्यमवर्गीय संसारी स्त्रीच्या वाटयाला येणारे जीवन तेंडुलकरांनी दाखविले आहे· अशा स्त्रीला कुटुंबात समान पातळीवरचे, साहचर्याचे स्थान नसते· नव-याची सर्व प्रकारची तैनात ठेवणे हीच तिची भूमिका असते· नव-यानेही बायकोला सहजपणे गृहित धरलेले असते· घर हे त्याचे हक्काचे विश्रांतीस्थान व बायको ही त्याची मालकीहक्काची उपभोग्य वस्तू असते· मालकाच्या मनाप्रमाणे वागणे व त्याच्या मागून मुकाटयाने जाणे हा त्या स्त्रीचा धर्म असतो· या पार्श्वभूमीवर सरिताचे वेगळेपण हेच की, तिला आपल्या पारंपरिक भूमिकेची, गुलामगिरीची जाणीव होते व ती त्या पारंपरिक स्त्री प्रतिमेला छेद देवू इच्छिते· नव-याच्या कीर्तीत समाधान मानणा-या सुखासीन, परावलंबी स्त्री प्रतिमेला छेद देण्याचा निर्धार व्यक्त करणारी, सरिताची व्यक्तिरेखा तेंडुलकरांनी मार्मिकपणे उभी केली आहे·

सरिता गुलामगिरीत वावरते आहे पण याची तिला स्पष्ट जाणीव नाही· जयसिंगचे तिच्या वरोबरचे वागणे समान पातळीवरचे नाही· "कमला"सारख्या परक्या स्त्रीला घरी घेवून आल्यानंतर पहिल्या भेटीत तो तिची ओळखही करून देत नाही· व्यावसायिक गुप्ततेच्या दृष्टीने तो टाळत असेल· पण कमलाबाबत तो सरिताला ज्या सूचना देतो-पत्रकार मित्र जैन आल्यावर कमलावर नजर ठेवायची व तिला बाहेर येवू न देण्याची· त्या सरिताला विचित्र वाटतात·[१०४] जयसिंगच्या पत्रकारितेच्या क्षेत्रातील स्पर्धेपासून, गुंतागुंती-पासून तेंडुलकरांनी सरिताला अलिप्त ठेवली आहे· जयसिंगच्या वर्चस्वाखालील संसारात गुरफटलेली एक सहृदय स्त्री म्हणूनच तिची प्रतिमा तेंडुलकरांनी रेखाटली आहे· तिला गुलामगिरीची जाणीव करून देत नाटकाला गती दिली आहे· त्यादृष्टीने जैनचे उद्गार सूचक वाटतात· "देशातल्या एक्सप्लायटेशन विरूध्द लढाया करणारा हा जयसिंग तुम्हाला एक्सापाईट करतो· एकावेळी हॉर्सरायडिंग आणि नेमबाजी करणा-या सरदार घराण्यातील एक पोरीची पार घरेलू औरत केली यानं" [जयसिंगला उद्देशून] शेम ऑन यू··। हीरो ऑफ अँटिएक्स्प्लॉयटेशन कॅम्पेन्स मेक्स अ बाँडेड लेबर ऑफ हिज वाईफ"[१०५]

जयसिंगचे वर्तन सरिताला नवीन नाही· गेले दहा वर्षे ती जयसिंगबरोबर संसार करते आहे· पण कमलाच्या निमित्ताने तिला जाग आली· कमलाचा माणूस म्हणून विचार न करणा-या जयसिंगबरोबर तिचा संघर्ष झाला· त्यातून ती अंतर्मुख होवून स्वतःचा शोध घेवू लागली· कमलाला अनाथश्रमात ठेवण्याच्या तिच्या विरोधाला जयसिंग जुमानत

नाही, काकासाहेब तिची समजूत काढतात.' त्याच्या {जयसिंगच्या} बुध्दीबळात कमला हे फक्त प्यादं आहे"[१०६] अशी कल्पना देतात. तेव्हा सरिता आवेगाने सांगते, "एकटी कमला नव्हे काकासाहेब मी सुध्दा.. मी सुध्दा"[१०७] तिला तिच्या भावना आवरत नाहीत. तिच्या मनाचा कोंडमारा तेंडुलकरांनी उत्कटपणे चित्रीत केला आहे.

सरिताची होणारी कोंडी जयसिंगपर्यंत पोहचू शकत नाही. किंबहुना सरिताही त्याला तशी स्पष्ट कल्पना देत नाही. जयसिंगच्या हुकमत गाजविण्याच्या वृत्तीबद्दलची सरिताची नाराजी तेंडुलकरांनी काही प्रसंगातून जयसिंगपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातला पहिला प्रसंग जयसिंगने प्रणयभावनेच्या हेतून तिच्या शरीराची केलेली मागणी व सरिताने दिलेला नकार. तसेच दुसरा प्रसंग - जयसिंगने सरिताला पार्टीला तयार व्हायला सांगितले असता तिने दिलेला नकार. आता हा नकार जेवढा जयसिंगच्या हुकुमशाही वृत्तीला तेवढाच नकार देण्यामागील त्योवळच्या पार्श्वभूमीला आहे. मुक्ता मनोहरांना तर सरिताच्या ह्या प्रतिक्रिया तात्कालिक स्वरूपाच्या वाटतात.[१०८] काकासाहेबांचा अपमान जयसिंगकडून होतो. यामुळे सरिता दुखावली जाते. म्हणून ती जयसिंगच्या प्रणय भावनेला नकार देते असा दुवा येथे जोडता येतो. तसेच पार्टीला यायला नकार देते कारण तिच्या मनाविरूध्द जयसिंगने कमलाची रवानगी अनाथाश्रमात केलेली असते. पार्टीला यायला नकार देण्यामागे आणखी एक महत्वाचे कारण आहे, ते म्हणजे सरिताला गुलामगिरीची झालेली जाणीव व त्या जाणीवेपोटी उमटलेली प्रतिक्रिया म्हणजेच तिचा नकार. कारण त्यानंतर ती स्पष्ट बोलून दाखविते, "कमलानं मला जागं केलं...मी बायको नाही. त्याचा एक गुलाम आहे."[१०९]

तेंडुलकरांनी सरिताच्या करारीपणाचेही दर्शन घडविले आहे. तिच्या मुखी पुरूषार्थासंबंधी त्यांनी जे विचार घातले आहेत ते निश्चितच लक्षणीय आहेत. बाईसुध्दा पुरूषार्थ करू शकते. मग लिंग कोणतेही असो. जो पुरूषार्थ करतो तो पुरुष व पुरूषार्थ करीत नाहीत त्या बाया. याबाबत ती देशाच्या तत्कालीन पंतप्रधानांचे {इंदिरा गांधी} उदाहरण देते. पंतप्रधानांच्या पुरूषार्थामुळे नाकी नऊ येवून त्यांच्या पायावर लोळणं घेणं हा सरिताला बायलेपणा वाटतो.[११०]

सरिताच्या करारी विचारांचे दर्शन घडत असतानाच एक कटू प्रसंग जयसिंगवर येतो. त्याचा मालक त्याला नोकरीवरून कमी करतो."जयसिंग संकटात सापडताच सरिता पुन्हा वेगळ्या प्रकारे हेलकावा घेते. त्यामुळे स्त्री-गुलामगिरीतून मुक्त होण्याबाबत तिने

व्यक्त केलेली प्रतिक्रिया मनोहरांना तात्कालिक स्वरूपाची वाटते.[१११] त्यांच्या मते, "सरिताची गुलामीची जाणीव म्हणजे नवरा बायकोच्या मतभेदातील तात्कालिक प्रतिक्रिया किंवा चहाच्या पेल्यातील वादळ. इतकेच पृष्ठभागीय स्वरूप धारण करते."[११२]

सरिता जरी वेगळ्या प्रकारे हेलकावा घेत असली तरी त्यापूर्वी ती निर्धार व्यक्त करताना म्हणते, " तूर्त मी सगळं मनाच्या एका कप्प्यात बंद करून विसरणारं आहे. एक दिवस असा येईल त्या दिवशी मी गुलाम असायची थांबणार.. माझ्यावर कुणीही सत्ता गाजवू शकणार नाही. तो दिवस नक्की येणार आहे. मग त्यासाठी कुठलीही किंमत मला मोजावी लागली तरी मी मोजेन."[११३] हा निर्धार महत्वाचा आहे. कोणत्याही गोष्टीची जाणीव होण्यासाठी प्रसंग घडावा लागतो. प्रसंग हा निमित्त असतो. गेल्या दहा वर्षात जयसिंगबरोबर संसारामध्ये संघर्षाचे-गुलामगिरीचे अनेक प्रसंग आलेले असणार. फक्त त्या प्रसंगाचा सरिताने जाणिवपूर्वक त्या दिशेने विचार केलेला नव्हता. त्यादृष्टीने "मी आजवर झोपलेले होते, मी जागी असून गुंगीत होते."[११४] हे तिचे उद्गार लक्षात घ्यावेत, त्यामुळे तिच्या प्रतिक्रिया तात्कालिक असल्यातरी त्यांना व्यापक संदर्भ आहे.

सरिताच्या व्यक्तिचित्रणातून तेंडुलकर वाचक/प्रेक्षकांना आधुनिक स्त्री समस्येला भिडवतात. एक ध्येयवादी, त्याबरोबरच सहृदय, सहानुभूतीशील व्यक्तिरेखा ते उभी करतात. प्रथम घरी आलेल्या कमलाला चहा देणे, तिच्यासाठी आपली साडी देणे, तिची आस्थेने विचारपूस करणे, अशा छोटया-मोठया प्रसंगातून ते, सरिताची संवेदनक्षमता व स्वभाव विशेषता स्पष्ट करतात. नाटकाच्या अखेरीस, जयसिंगच्या पायातले बूट काढण्याच्या प्रसंगातून स्त्री सुलभ वृत्तीचे दर्शन घडवितात. त्याचबरोबर नजरेत एक शांत भाव.. नजर दूरवर भविष्यात स्थिरावलेली. मुद्रेवर निर्धार"[११५] या कंससूचनेतून नवस्त्रीची भावी वाटचाल सुचित करतात. एकूण स्त्री समस्या नेमकेपणाने मांडून नवा निर्धार बाळगणारी "नायिका" त्यांनी मनस्वीपणे चित्रीत केली आहे.

**कमला ::::**

कमला या व्यक्तिरेखेच्या निर्मित्तीचे नाते सरिताच्या गुलामगिरीशी जसे आहे तसेच ते सामाजिक अन्यायाशी आहे. माणसांच्या बाजाराचे महाभयानक सत्य मांडणा-या घटनेच्या आधारे, तेंडुलकरांनी सध्या उपेक्षित स्त्रीची होणारी विटंबना स्पष्ट केली आहे. परंतु

हे स्पष्ट करण्यासाठी ते प्रस्तुत घटनेचे भांडवल करून समाजाला धडे देत नाहीत तर सहजपणे अंतःमुख करतात. "एका सामाजिक अन्यायाला तेंडुलकरांनी या नाटकात उत्कट प्रसंगाच्या आधारे वाचा फोडली आहे. पण हे नाटक कोठेच प्रचारकी वाटत नाही"[११६] अशी प्रतिक्रिया डॉ.वि.म.कुलकर्णी व्यक्त करतात. दिल्लीत घडलेल्या एका घटनेचा वृत्तान्त, व त्याला नाट्यरूप आकार देताना कमलाची निर्मिती ही एक अपरिहार्य बाब होती. तिची निर्मिती नाटकातील मूळ समस्येला पोषकच आहे. सरितापासून कमलाला बाजूला काढून तिचा स्वतंत्रपणे विचार करावा, एवढा वाव, "कमला" या व्यक्तिरेखेला नाही. मागे म्हटल्याप्रमाणे, कमला हे सरिताच्या समस्या उद्घाटनाचे निमित्त आहे. तिचे आणि सरिताचे जग पुष्कळ वेगळे आहे. तिच्या व सरिताच्या समस्याही भिन्न आहेत. फक्त "गुलामगिरी" एवढेच काय ते साम्य आहे. कमलाच्या भावना लक्षात घेता तिला जयसिंग नायक वाटतो तर सरिताला तो खलनायक वाटतो.सरिता त्याचे कारण संसारच सांगते.[११७] म्हणजे संसारामुळे सरिताच्या जीवनात प्रश्न निर्माण झाला आहे तर संसारामुळे कमलाचा प्रश्न सुटणार आहे. संसाराचे सुंदर स्वप्न ती रंगविते. तिला आपल्या मर्यादांची जाणीव आहे, याची कल्पना सरितावरोवर होणा-या संवादातून प्रत्ययास येते. घरदार सांभाळण्याची जबाबदारी ती स्वखुषीने स्वीकारते. मालकीण म्हणून ती हक्कही सांगते. थोडी संधी मिळाली की हालातली माणसं देखील कशी खुलतात याचे भावस्पर्शी चित्रण तेंडुलकरांनी "कमला" व्यक्तिरेखेव्दारे केले आहे.

स्त्री व्यक्तिचित्रणामध्ये **"कमळाबाई"** या ही नाटकामध्ये डोकावतात. त्यांच्या समस्या वेगळ्या आहेत. आपल्या मूळ घरापासून दूर परप्रांतात घरकाम करणा-या कमळाबाई कुरकूर करताना दिसतात. दिल्लीची हवा, काम न ऐकणारी नोकर माणसं, त्यानंतर कमलाची हुकमत, याविषयी त्या तक्रार करताना दिसतात. कमला घरातून जाणार समजताच "बेस झालं गेली ती. ब-या चालीची न्हवती"[११८] म्हणतात. माहेरचं माणूस म्हणूनच सरिताने कमळाबाईला घरकामासाठी आणले आहे. प्रस्तुत नाटकातील स्त्री समस्या संदर्भात कमळाबाईची विशेष दखल घ्यावी असा त्यांना वाव नाही. उच्चमध्यम-वर्गीय असे घराचे वातावरण निर्मितीसाठी घरकाम करणा-या कमळाबाईचे पात्र उपयोजलेले दिसते.

स्त्री समस्येच्या संदर्भात जयसिंग आणि **काकासाहेब** यांच्या व्यक्तिरेखेकडे पाहिल्यास, दोघांमध्ये काही बाबतीत साम्य दिसते. ते म्हणजे दोघांकडूनही पत्नीला मिळणारी

वागणूक पारंपरिक आहे· सरिता जेव्हा जयसिंगच्या पुरुषीवर्चस्वा विरूध्द आपली नाराजी व्यक्त करते· तेव्हा काकासाहेब तिला सांगतात, " अग मी सुध्दा असाच होतो, आता वाटतो त्यावर जावू नकोस, तुझ्या काकूला भरपूर त्रास दिला· एका हक्कानं दिला· तिला काय वाटत असेल याची मुळीसुध्दा फिकीर केली नाही· मी आपला पुढं बघत चाललो• मागून ती फरफटत का होईना, येणार अशी खात्री होती· आली बिचारी· "[११९]

काकासाहेबांनी आपल्या कुटुंबाबाबत जी भूमिका घेतली, तीच जयसिंगने घेतली आहे· फरक एवढाच की, काकासाहेब आपल्या भावना व्यक्त करतात· कारण त्यांना पत्नीला दिलेल्या वागणूकीची जाणीव आहे· समंजस, सरळमार्गी, तितकेच धाडसी असे काकासाहेबांचे व्यक्तिमत्व आहे· त्यांचे बोलणे उपहासात्मक, उपरोधक व धारदार आहे· आजच्या पत्रकारितेवर ते परखड भाष्य करतात· याबाबतीत त्यांचा जयसिंगशी संघर्ष होतो· दोन पिढयातील पत्रकार उभे करून तेंडुलकरांनी त्यांच्यातील साम्य-विरोधाचे मार्मिक चित्रण केले आहे· त्यात जयसिंगच्या व्यक्तिरेखेला अधिक प्राधान्य आहे· पत्रकार आणि पती अशा भूमिकेतून जयसिंगची व्यक्तिरेखा रेखाटली आहे· काकासाहेब-जयसिंग, जयसिंग-सरिता असा संघर्ष चित्रीत केला आहे· त्यामुळे नाटक मूळ समस्येतून बाजूला न जाता अधिक वास्तववादी, वेधक व प्रवाही होते· जयसिंग तरूण असल्याने त्याच्या भावना तीव्र आहेत· तर गांधीवादी विचारसरणीचे काकासाहेब क्षमाशीलवृत्तीचे वृध्द गृहस्थ आहेत· जयसिंगबरोबर झालेल्या वादविवादाचा परिणाम सरितावर होवू नये याची ते काळजी घेतात· तणावपूर्ण वातावरण निवळण्यासाठी प्रसंगी जयसिंगची क्षमाही मागतात· जयसिंग मात्र आपल्या अधिकारात, मस्तीत राहणारा• एखाद्या व्यक्तीचा "माणूस" म्हणून संमजसपणे, सहानुभूतीने विचारा करावा, हे त्याच्या स्वभावात नाही· मग ती कमला असो वा कमळाबाई असो· कमळाबाईंना उगाच चहा देण्याचा त्रास कशाला? असे काकासाहेब म्हणतात, "त्रास कसला··वुई पे हर फॉर दॅट"[१२०] असे जयसिंग म्हणतो· काकासाहेबांचा जयसिंगच्या पत्रकारितेला विरोध असलातरी, त्याच्या कर्तृत्वाबद्दल ते प्रशंसोद्‌गार काढतात· जयसिंगच्याही उत्साही, धाडसी, महत्वाकांक्षी पत्रकारितेतील वृत्तीचा प्रत्यय नाटकात येतो· त्याचबरोबर त्याच्या सहज वागण्या-बोलण्यातून पुरूषी वर्चस्वाचीही प्रचिती येते·

एकूण नाटकातील व्यक्तिरेखांचा विचार करता, सरिता-कमला, जयसिंग-काकासाहेब अशी भिन्न पातळीवरची, भिन्न पिढीतील मंडळी दिसतात· या व्यक्तिरेखात सरिता-कमलाचे गुलामगिरीबावत साम्य आहे· तर काकासाहेब-जयसिंग यांचे कार्यक्षेत्राबाबत साम्य आहे· मात्र या साम्य दर्शविणा-या व्यक्तिरेखांच्या विचारसरणीत मात्र साम्य नाही,

विरोध आहे. गो.म.कुलकर्णी म्हणतात,"तेंडुलकरांच्या पाच प्रभावळीत दोन पिढयांची मंडळी असली तरी त्यातल्या त्यात प्रौढ व तरूण दंपति जीवनाला अधिक महत्व असते. त्यातून साम्य-विरोधाचे विशेषतः विरोधाचेच सूत्र खेळविले जाते." [१२१]

जयसिंगचा पत्रकार मित्र जैन या व्यक्तिरेखेला अल्पप्रमाणात वाव असलातरी ती ही व्यक्तिरेखा उठावदार आहे. जयसिंगच्या पत्रकारितेतील स्पर्धा, त्या पत्रकार परिषदेचे वातावरण यावर भाष्य करण्यासाठी तेंडुलकरांनी या पात्राची निर्मिती केली आहे. सरिताला तिच्या गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी - त्यासाठी परखडपणे आपल्या मित्राची हजेरी घेणारा जैन महत्वाची कामगिरी बजावताना दिसतो.

तेंडुलकर व्यक्तिचित्र रेखाटत असताना, ते वास्तववादी पातळीवरून रेखाटतात. म्हणजे उगाच पल्लेदार वाक्ये वा आलंकारिक शब्दरचनेचा वापर न करता, त्या व्यक्तिरेखेच्या दैनंदिन व्यवहारातील भाषा त्यांच्या तोंडी वापरतात. जयसिंगच्या बोलण्यात इंग्रजी शब्दांचा वापर अधिक जाणवतो. पण तो ज्या दिल्लीच्या वर्तुळात वावरतो आहे. त्याचे संस्कार रोजच्या बोलण्यावर झाल्याने 'इंग्रजी शब्द वापर' त्यांना अपरिहार्य वाटतो. तसेच कमलाशी जे पृ. २४.२५,२६,३१,३२,३३ वर संवाद चित्रीत केले आहेत ते हिंदीतून आहेत. कमला ही विहार प्रदेशातून आल्याने ते संवाद ही स्वाभाविक वाटतात. साध्या साध्या हालचाली, सहज संवादातून व्यक्तिरेखचे स्वभावविशेष स्पष्ट होत जातात.

## xxx नाटकाची संवादशैली xxx

तेंडुलकर हे भाषाविलासात रमत नाहीत. परंतु प्रसंगी त्यांची भाषा नटरंगी रूप धारण करते. उपहास, उपरोध यांचे मार्मिक दर्शन घडविते. उदा.जयसिंग, जैन हे पत्रकार परिषदेचा वृत्तान्त कथन करतात. तेव्हा जयसिंग म्हणतो - माणसांच्या बाजाराचं महाभयानक सत्य उजेडात यावं म्हणून मी प्रेस कॉन्फरन्स घेतली. त्यावर काकासाहेब म्हणतात -"आणि एका बाईचा बाजार केलास". काकासाहेबांचा नव्या पध्दतीने वृत्तपत्र चालविण्याचा बेत हा ही सांप्रत पत्रकारितेवर प्रकाश टाकण्याचाच एक प्रयत्न आहे. या ठिकाणी काकासाहेबांचा मिष्किल स्वभाव, उपहासात्मक भाषा व तितकीच परखडवृत्ती दिसते. छोटया छोटया वाक्यातून पुढे जाणारे संवाद नाटकाला गती देतात. संवादासाठी वापरलेल्या भाषेत अलंकाराचा हव्यास नसतो. "नाटकातील भाषेबद्दल आज दोन टोकांचे पक्ष निर्माण झालेले आहेत. एक भाषेला प्राधान्य देणारा तर दुसरा तिला अतिशय गौण

लेखणारा· तेंडुलकर याबाबतीत मध्यमवर्गीय आहेत·" [१२२] असे मत गो·म·कुलकर्णी व्यक्त करतात·

××× संवादशैलीचे नमुने ×××

तेंडुलकरांची संवादशैली परिणामकारक आहे· मिताक्षरता हा त्यांच्या संवादशैलीचा एक विशेष आहे· जयसिंग-सरिता यांच्यातील संवादाचा एक नमुना पाहू या·

१) संवाद [१२३]

सरिता : तिला घेवून निघता आहात·

जयसिंग : का? काय झालं? वेळ आहे अजून·

सरिता : माझ्याकडे माझी एखादी साडी मागते आहे ती·

जयसिंग : (वैतागून) काय? कमला? मुळीच देवू नको· काही द्यायची नाही तिला! मला विचारल्याशिवाय काही देवू नको· आय टेल यू·

सरिता : मी विचारायलाच आले·

जयसिंग : मी तेच तुला सांगतो आहे· आहे त्या साडीतच प्रेस कॉन्फरन्सला येईल ती·

सरिता : बाईची जात, तिची साडी फाटली आहे—

जयसिंग : (आवाज चढवून) आय नो· आय नो· मला हे सांगण्याची गरज नाही· अंडरस्टँड? मला सगळी कल्पना आहे· तसंच मला तिन प्रेस कॉन्फरन्समध्ये दिसायला हवं आहे· फार महत्वाचे आहे ते·

सरिताची सहानुभूतीशील वृत्ती, स्त्रीसुलभ भावना आणि जयसिंगची हुकुमशाहीवृत्ती यांचे नेमके दर्शन प्रस्तुत संवादातून घडते·

जयसिंग आणि सरिता यांच्यातील चकमक व तणाव चित्रीत करणारा एक खटकेबाज संवादाचा नमुना पाहा·

२) संवाद [१२४]

जयसिंग : तुला पार्टीला यायचं नाही का?

सरिता : नाही·

जयसिंग : पार्टीला यायचं नाही? का?

सरिता : माझी मर्जी·

जयसिंग : तुझी मर्जी?

सरिता : असू नये.

जयसिंग : {उपरोधिक स्वरात} अजूनपर्यंत कधी दिसली नाही. यायचं नव्हतं तर आधी तसं सांगायचं तरी म्हणजे मी आपण दोघ येतो असं कळवलं नसतं.

सरिता : मला विचारलं होतंत?

जयसिंग : ऑफ कोर्स. कमळाबाईकडे निरोप दिला.

सरिता : त्याला विचारणं म्हणत नाहीत.

जयसिंग : तू मला उलट फोन करू शकत होतीस.

सरिता : मी फोनवर येईतोवर तुम्ही थांबू शकत होतातं.

जयसिंग : मी कामात होतो.

सरिता : तुम्हाला फोन करण्याचा मला उत्साह नव्हता.

जयसिंग : आजच तुझ्या उत्साहाला काय झालं?

सरिता : {पॉइंटेडली} ऐकायचयं?

जयसिंग : ते राहू दे, आधी तू येतेस का नाही येत, एकदाच ठरव बघू.

सरिता : ते कधीच ठरवलयं.

सरिताची भावावस्था, तिची नाराजी व जयसिंगचा अहंभाव, उत्कटपणे चित्रीत करणारा संवाद नाटकाची वेधकता वाढवतो.

### ××× नाटकातील जीवनभाष्ये ×××

तेंडुलकर मानवी संबंधाचे, मनातील ताण-तणावांचे सहजपणे दर्शन घडवितात. प्रस्तुत नाटकातील संवादातून तेंडुलकर जीवनभाष्यपर विचार व्यक्त करतात. तशा प्रकारची विधाने नाटकात आढळतात.

"हालातली माणसं जरा निमित्त मिळालं की छान खुलतात, कष्टाची सवय लागते पण सुखाला सवय लागत नाही." [१२५]

"माणूस मोठा होतो, तर तो मोठा माणूस का नाही होतं? त्याचा मालक का होतो." [१२६]

"प्रौढपणी माणसानं विकारानं नव्हे, विचारानं वागायचं असतं. समजुतीन जगायचं असतं." [१२७]

"गाढ झोपेत सगळेच मालक किती निष्पाप वाटतात." [१२८]

वरील विधानातून तेंडुलकरांच्या जीवन चिंतनाचा प्रत्यय येतो. डॉ.बर्वे म्हणतात, "तेंडुलकरांचे जीवनचिंतन म्हणजे माणूस, त्याचे शरीर व मन, त्याचा अहंभाव, भोवतालचा गोतावळा, गोतावळ्याशी असलेल्या संबंधाची निरर्थकता, मग येणारा एकाकीपणा, पाप-पुण्याच्या कल्पना, सा-याची अनिश्चितता, थोडक्यात, माणसाचे व्यक्तिगत सत्व, त्याचे सामाजिक अस्तित्व या दोहोंतील संवादित्व-विसंवादित्व,याविषयीचे चिंतन होय." [१२९] "माणूस म्हणून माणसाचा विचार व्हावा, माणूस म्हणून त्याने स्वतंत्र वाटचाल करावी, अशी तेंडुलकरांची इच्छा प्रगट होते. स्त्री जीवनाकडे त्यांचा पाहण्याचा विशाल दृष्टिकोन प्रत्ययास येतो. सरिता आपल्या भावना व्यक्त करताना जे विचार मांडते ते सद्यपरिस्थितीत लक्षणीय वाटतात.

"बाईनं काय म्हणून नाही एकदा तरी मालकं व्हायचं? निदान तिनं काय म्हणून नाही माणसाच्या लायकीनं जगू मागायचं ? पुरुषार्थ करण्याचा हक्क काय तो पुरुषालाच काय म्हणून? त्याला एक वेगळं इंद्रिय दिलं आहे म्हणून? बाईसुध्दा पुरुषार्थ करू शकते." [१३०]

स्त्री मनात खदखदत असणा-या तीव्र भावना ते व्यक्त करतात. अशावेळी त्यांच्या भाषेला वक्तृत्वाची धार येते. उच्चमध्यमवर्गीय स्त्रीची एक प्रभावी प्रतिमा ते मार्मिक प्रसंग-संवादाव्दारे चित्रीत करतात. "कणखर व्यक्तिरेखा, नियतीचा विचित्र खेळ आणि नवा निर्धार बाळगणारी नायिका, यामुळे "कमला" हे लक्षात राहण्याजोगे एक मनस्वी नाटक झाले आहे." [१३१] अशी प्रतिक्रिया डॉ.वि.म.कुलकर्णी नोंदवतात.

## xxx निष्कर्ष xxx

कमला हे स्त्री स्वातंत्र्यविषयक एक मनस्वी नाटक आहे. रूढ परंपरेचा चिकित्सक बुध्दीने अभ्यास करून, कलात्मक पातळीवर नवविचारांचे दर्शन घडविणारे हे नाटक थेटपणे स्त्री गुलामगिरीच्या समस्येला भिडविते. स्त्री मनाची कोंडी फोडण्याचे सामर्थ्यही नाटकात जाणवते. व्यक्तींचे अंतर्बाह्य आचार,विचार, त्यांच्या अंतर्मनातील प्रवाह, विरोध, उपरोध, विसंगती यांचे वास्तववादी व परिणामकारक चित्रण प्रस्तुत नाटकात येते. तेंडुलकरांच्या "नाटयलेखनाचा धर्म" विशद करताना गो.म.कुलकर्णी म्हणतात, "आशय-अभिव्यक्तीदृष्टया

तेंडुलकरी नाटकात बरीच स्थित्यंतरे झालेली आहेत. तेंडुलकर हे मूलतः वास्तववादी परंपरेचे नाटककार आहेत. प्रसंगावशात त्यांनी कल्पना रम्यतेचा आश्रय केलेला असतो. पण तो वास्तवाचा पाया बळकट करण्यासाठीच सामान्य स्तरावरील पांढरपेशा वर्ग आणि त्याची सुख दुःखे, विशेषतः दुःखेच. हा त्यांच्या चित्रणाचा व चिंतनाचा मुख्य विषय. साध्या दैनंदिन घटनेतील नाट्य समर्थपणे पेलणे हा त्यांच्या नाट्यलेखनाचा धर्म." [१३२]

आशयाचे अंगभूत गुणधर्म, लेखकाची वृत्ति-प्रवृत्ती आणि सामाजिक, सांस्कृतिक स्थितीगती यांच्या संयोजनातून साहित्यकृतीची निर्मिती होते. आपल्याला काय मांडावयाचे व कसे मांडावयाचे म्हणजे काय अभिव्यक्त करावयाचे आहे, हे ठरल्यावर लेखक आपला वृत्ति-प्रवृत्तीला जवळ वाटणारा वाङ्मयप्रकार निवडतो. तेंडुलकरांनी अभिव्यक्तीसाठी नाटक हा प्रकार निवडला. प्रारंभी त्यांनी कथालेखन केले. परंतु कथा लिहिताना सारखे संवादच येवू लागले. त्यातून एकांकिकेचा फार्म त्यांच्या हाताशी आला [१३३] व पुढे ते नाटकाकडे ओढले गेले. तेंडुलकरांनी नाट्यक्षेत्रात नवे प्रयोग केले. त्यामुळे गो. पु. देशपांडे, तेंडुलकरांना "पहिले आधुनिक भारतीय नाटककार" [१३४] ठरवितात. त्यांना त्यांच्या नाटकात "औद्योगिकरणामुळे भरभराटीस आलेल्या, नव्या भोगवादी समाजाचे आयुष्य आणि खेळ, त्याचा भोग आणि त्यांची हिंसा ह्याचे दर्शन होते." [१३५]

प्रवाही जीवनाचे प्रतिबिंब आजच्या नाट्यरचना व मांडणीमध्ये पडलेले दिसते. प्राचीन संस्कृत परंपरेप्रमाणे सात अंकी किंवा पाच अंकी नाटक पाहण्याची सध्याच्या प्रेक्षकांना सवड नाही, हे ओळखूनच आजचे नाटक दोन अंकीही दिसते. प्रस्तुत कमला हे नाटकही दोन अंकी आहे. स्त्री स्वातंत्र्यविषयक समस्येचे आटोपशीर दर्शन तेंडुलकरांनी घडविले आहे. पहिल्या अंकाची घडण नेटकी आहे. प्रवाही प्रारंभ, नायकाच्या आगमनाची उत्कंठा, संवादातून सहजपणे गती घेणारे कथानक, घटना, प्रसंग, संवादातून साकार होणा-या व्यक्तिरेखा आणि त्यांचे स्वभावविशेष नेमकेपणाने चित्रीत केले आहेत. त्यामध्ये सरिताचे पारंपरिक जीवन, कमलाचे आगमन, जयसिंगचे वागणे, त्यातून सरिताची होणारी गुलामगिरीची जाणीव, याशिवाय पत्रकारितेची नवी दृष्टी स्पष्ट केली आहे. दुस-या अंकापासून गंभीर,तंग होत जाणारे वातावरण, वेधक चकमकीतून वाढत जाणारा संघर्ष,सरिताची मनोवस्था,अंतर्मुखता, पारंपरिक स्त्री प्रतिमेला छेद देण्याचा तिचा निर्धार यांचे प्रत्ययकारी चित्रण करून तेंडुलकरांनी "कमला" नाटकाव्दारे स्त्री-अन्यायाला वाचा फोडली आहे. प्रस्तुत 2 अंकी नाटकामध्ये तेंडुलकरांनी भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान आणि समस्या स्पष्ट करून मानवी हक्क व स्वातंत्र्याची मागणी करणा-या नवस्त्रीच्या विशिष्ट जाणीवेस जाणारा प्रवास प्रभावीपणे चित्रीत केला आहे.

### ××× संदर्भ टीपा ×××

#### प्रकरण चौथे


१ देशपांडे वि·भा·(संपा·),"रंगयात्रा" नाटयसंपदा प्रकाशन,मुंबई, १९८८,पृ·२४४,२४५

२ कुलकर्णी वि·म·,"तीन अर्वाचीन नाटयकृती", महाराष्ट्र साहित्यपत्रिका,ऑक्टो·-नोंव्हे-डिसें· १९८२ , पृ४७

३ तेंडुलकर विजय, "कमला" निलकंठ प्रकाशन, पुणे, १९८२, पृ·१

४ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", सुगावा प्रकाशन,पुणे १९८८, पृ·५२

५ तेंडुलकर विजय, "कमला," उ·नि·पृ· ८

६ तत्रैव, पृ· १८

७ तत्रैव, पृ· १८,१९

८ तत्रैव, पृ· २८

९ तत्रैव, पृ· २८

१० तत्रैव, पृ· ३३

११ तत्रैव, पृ· ३८

१२ तत्रैव, पृ· ३८

१३ तत्रैव, पृ· ४०

१४ तत्रैव, पृ· ४१

१५ तत्रैव, पृ· ४२

१६ तत्रैव, पृ· ४२

१७ तत्रैव, पृ· ४२,४३

१८ तत्रैव, पृ· ५१

१९ तत्रैव, पृ· ५१

२० तत्रैव, पृ· ५१

२१ तत्रैव, पृ· ५१

२२ तत्रैव, पृ· ५२

२३ तत्रैव, पृ· ५२

२४ तत्रैव, पृ· ५६

२५ तत्रैव, पृ. ५७

२६ तत्रैव, पृ. ५८

२७ तत्रैव, पृ. ६४

२८ नवरे कृष्णशास्त्री (संपा), "मनुस्मृती", अध्याय नववा, श्लोक ३ रा, रामवाडी, मुंबई, व्दि. आ. १८९४

२९ भालेराव विमल, "आधुनिक मराठी वाड्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास," साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९८६, पृ. १६७

३० परांजपे कल्पना, "मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री समस्या", गंधर्व-वेदप्रकाशन, पुणें, १९८४, पृ. २१७

३१ माळी-प्रधान (संपा.), " म. फुले गौरव ग्रंथ, "महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग' प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. ३०३, ३०४

३२ खांडगे मंदा, "शतपत्रांतून जाणारी स्त्री" लेख, रविवार सकाळ, पुणे, ४ आक्टो. १९९२, पृ ९

३३ माळी-प्रधान (संपा.) म. फुले गौरव ग्रंथ, उ. नि. पृ. ९९

३४ दळवी प्रशांत, "चारचौघी" मनोगत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९१, पृ. ८

३५ तत्रैव, पृ. २

३६ कुलकर्णी वि. भा., "नाट्याभिरुची कोण घडवितो?", दे. सकाळ (पाडवा पुरवणी) पुणे, २६ ऑक्टो. १९९२, पृ. ५

३७ कोरान्ने मधुरा, "कथाश्री" वार्षिक, मुंबई, १९९२, पृ. १५७

३८ तेंडुलकर विजय, "कमला" उ. नि. पृ. ४२

३९ तत्रैव, पृ. ५१

४० तत्रैव, पृ. ५७

४१ तत्रैव, पृ. ५७

४२ अनंतराम-वंडसे (संपा.), "भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७, पृ. ७

४३ तेंडुलकर विजय, "कमला", उ. नि. पृ. ५६, ५७

४४ भागवत विद्युत, "माहेर" पाक्षिक', पुणे १ ते १५ जाने. १९८७, पृ. २३

४५ भागवत विद्युत, "मिळून सा-याजणी", दिवाळी अंक, ऑक्टो-नोंव्हे १९९२, पृ. २०

४६ परूळेकर आशा, "आधुनिक स्त्रीच्या समस्या", मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, १९९२, पृ. ११

४७ आलासे वीणा, "मिळून सा-याजणी", दिवाळी अंक, उ.नि.पृ. ११७

४८ तेंडुलकर विजय, "कमला", उ.नि.पृ. ५७

४९ तत्रैव, पृ. ६४

५० मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ.नि.पृ. ५२

५१ आलासे वीणा, "मिळून सा-याजणी", दिवाळी अंक, उ.नि.पृ. १११

५२ तेंडुलकर विजय, "कमला" उ.नि.पृ. १०

५३ तत्रैव पृ. ५८

५४ कोरान्ने मधुरा, "कथाश्री", वार्षिक, उ.नि.पृ. १५७

५५ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ.नि.पृ. ५४

५६ तत्रैव, पृ. ५६

५७ तेंडुलकर विजय, "कमला", उ.नि.पृ. ५६

५८ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ.नि.पृ. ५६

५९ परूळेकर आशा, "आधुनिक स्त्रीच्या समस्या", उ.नि.पृ. १०

६० तेंडुलकर विजय, "कथाश्री" वार्षिक मधील कोरान्ने यांच्या लेखावरून घेतलेले विधान,उ.नि.पृ. १५७

६१ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा," उ.नि.पृ.५६

६२ तेंडुलकर विजय, "कमला", उ.नि.पृ. ६४

६३ तत्रैव, पृ. ६४

६४ बर्वे चंद्रशेखर, "तेंडुलकरांची नाटके", राजहंस प्रकाशन,पुणे, ८५,पृ. ६३, ६४

६५ विजय तेंडुलकर, "कमला", उ.नि.पृ. ६४

६६ गारडा-डुंबरे यांनी घेतलेली विजय तेंडुलकर यांची मुलाखत, साप्ता. सकाळ दिवाळी अंक, १९९१, पृ. १५

६७ सारंग लालन, मिळून सा-याजणी, दिवाळी अंक, उ.नि.पृ.८२

६८ तेंडुलकर विजय, "कमला", उ.नि.पृ.६४

६९ सोमण अंजली, "साहित्य आणि सामाजिक संदर्भ", प्रतिमा प्रकाशन,पुणे, १९८९, पृ. ६५

७० भागवत विद्युत, "मिळून सा-याजणी", दिवाळी अंक, उ.नि.पृ.३०

७१ परूळेकर आशा, "आधुनिक स्त्रीच्या समस्या", उ.नि.पृ. ९२

७२ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ·४१

७३ तत्रैव, पृ· २७

७४ सारडा, डुम्बरे यांनी घेतलेली विजय तेंडुलकर यांची मुलाखत, साप्ता·सकाळ, दिवाळी अंक १९९१, पृ· १६, १७

७५ कानडे रामचंद्र गोविंद, "मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९३८, पृ· ११६

७६ तत्रैव, पृ· ३

७७ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· ३३

७८ तत्रैव, पृ· १९

७९ तत्रैव, पृ· ८

८० तत्रैव, पृ· २०

८१ तत्रैव, पृ· २८

८२ तत्रैव, पृ· २८

८३ तत्रैव, पृ· २९

८४ तत्रैव, पृ· २९ ३०

८५ तत्रैव, पृ· ३०

८६ पै-तेंडुलकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत, "साहित्यातून सत्याकडे", डिंपल पब्लिकेशन, वसईरोड स्टेशन, १९८८, पृ· १९

८७ तत्रैव, पृ· ५२०

८८ तेंडुलकर विजय, "कमला" उ·नि·पृ· ३०

८९ तत्रैव, पृ· ३५

९० तत्रैव, पृ· ३५

९१ तत्रैव, पृ· ३६

९२ तत्रैव, पृ· ३६

९३ तत्रैव, पृ· ३७

९४ तत्रैव, पृ· ३७

९५ तत्रैव, पृ· ३८

९६ तत्रैव, पृ· ३८

९७ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ·नि·पृ· ५३

९८ सारडा, डुम्बरे यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत, उ·नि·पृ· १७

९९ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· ५९

१०० तत्रैव, पृ· ५९

१०१ कानडे रामचंद्र गोविंद ; . , "मराठी नियतकालिकांचा इतिहास",उ·नि·पृ· ४६

१०२ तत्रैव, पृ· ४, ५, ६

१०३ देशपांडे वि·भा· (संपा·), "रंगयात्रा", उ·नि·पृ· ११६

१०४ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· २२

१०५ तत्रैव, पृ· २२

१०६ तत्रैव, पृ· ५२

१०७ तत्रैव, पृ· ५२

१०८ मनोहर मुक्ता,"मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ·नि·पृ· ५५

१०९ तेंडुलकर विजय, "कमला" उ·नि·पृ· ५६, ५७

११० तत्रैव, पृ· ५८

१११ मनोहर मुक्ता, "मराठी नाटकातील स्त्री प्रतिमा", उ·नि·पृ· ५६

११२ तत्रैव, पृ· ५४

११३ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· ६४

११४ तत्रैव, पृ· ५६

११५ तत्रैव, पृ· ६४

११६ कुलकर्णी वि·म·,"तीन अर्वाचीन नाटयकृती", उ·नि·पृ· ४८

११७ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· ५६

११८ तत्रैव, पृ· ५२

११९ तत्रैव, पृ· ५७

१२० तत्रैव, पृ· ४४

१२१ कुलकर्णी गो·म·, "नाटककार विजय तेंडुलकर" :एक जिंकणे-हरणे," सत्यकथा, डिसे· १९७१ , पृ· ४८, ४९

१२२ तत्रैव, पृ· ५०

१२३ तेंडुलकर विजय, "कमला", उ·नि·पृ· २७

१२४ तत्रैव, पृ. ५४, ५५

१२५ तत्रैव, पृ. १७

१२६ तत्रैव, पृ. ५७

१२७ तत्रैव, पृ. ५८

१२८ तत्रैव, पृ. ६४

१२९ बर्वे चंद्रशेखर, "तेंडुलकरांची नाटके", उ.नि.पृ. ७७

१३० तेंडुलकर विजय, "कमला", उ.नि.पृ. ५८

१३१ कुलकर्णी वि.म.,"तीन अर्वाचिन नाटयकृती", उ.नि.पृ. ४९

१३२ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.),"मराठी विश्वकोश खंड सातवा",म.रा.सा.संस्कृती मंडळ प्रकाशित, मुंबई, १९७७, पृ.४४८

१३३ पै-तेंडुलकर यांनी घेतलेली विजय तेंडुलकर यांची मुलाखत, "साहित्यातून सत्याकडे", उ.नि.पृ. ५१८

१३४ देशपांडे गो.पु.,"मराठी नाटक : एका सामाजिकतेचा प्रवास : विष्णुदास भावे ते तेंडुलकर", समाजप्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून १९९१ पृ.७२

१३५ तत्रैव, पृ. ७१,७२

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR